सप्टेंबर, २०२५

आपलं मंत्रालय

एक सुसंवाद

माहितीचा अधिकार सप्ताह

दि.05 ऑक्टोबर ते 12 ऑक्टोबर

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, 2005
(2005 चा अधिनियम क्र.22) दि.15 जून 2005

दि.15 जून 2005 पासून अंमलात आलेली कलमे :

कलम 4 चे पोट कलम (1)
कलम 5 ची पोट कलमे (1) व (2)
कलमे 12, 13, 15, 16, 24, 27 आणि 28

माहिती अधिकार कायद्याची महत्त्वाची उद्दिष्टे

पारदर्शकता आणि जबाबदारी :
या कायद्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामकाजात पारदर्शकता येते आणि शासनावर जबाबदारी निश्चित होते. नागरिकांना माहिती मिळाल्याने प्रशासकीय यंत्रणा अधिक कार्यक्षम बनतात.

भ्रष्टाचारावर नियंत्रण :
सरकारी यंत्रणा कशा काम करतात, हे नागरिकांना कळल्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो आणि फसवणूक नियंत्रित करता येते.

नागरिकांचे सक्षमीकरण :
नागरिकांना माहितीचा अधिकार दिल्याने ते सार्वजनिक प्राधिकरणांवर प्रश्न विचारू शकतात, ज्यामुळे लोकशाही प्रक्रिया अधिक प्रभावी होते.

सार्वजनिक कामांची माहिती :
शासकीय कामकाजाची पद्धत, योजनांची अंमलबजावणी आणि त्यातील टप्पे यांची माहिती नागरिकांना मिळते, ज्यामुळे ते या कामांमध्ये सक्रिय भूमिका घेऊ शकतात.

लोकशाहीची प्रक्रिया सक्षम करणे :
जनतेला माहिती मिळाल्याने ती लोकशाही प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होऊ शकते आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवू शकते.

कलम 4(1)(ख) नुसार सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने करावयाची कार्यवाही :
मा.सर्वोच्च न्यायालयामधील मुळ याचिका (सिव्हील) क्र.990/2021, दिनांक 17 ऑगस्ट 2023 चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.रामाआ 2019/प्र.क्र.18/सहा, दिनांक 16.02.2023 अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 4 च्या अंमलबजावणीबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 4 अनुसार 17 मुद्यांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी 1 जानेवारी व 1 जुलै) अद्ययावत करण्यात यावी तसेच कलम 4 व्यतिरिक्त कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शित करणे आवश्यक असलेली सर्व माहिती कार्यालयाच्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी.

अधिनियमांतील महत्त्वाची कलमे

- कलम 3 - या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून सर्व नागरिकांना माहितीचा अधिकार असेल
- कलम 4- सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने
- कलम 5- जन माहिती अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करणे
- कलम 6 (1) माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे
- कलम 8- माहिती प्रकट करण्याबाबत
- कलम 11 – त्रयस्थ पक्षाची माहिती
- कलम 18- माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये (तक्रार)
- कलम 19 (1) प्रथम अपिल
- कलम 19(3) द्वितीय अपील
- कलम 20 – शास्ती
- कलम 25- संनियंत्रण करणे व अहवाल देणे
- कलम 26-समुचित शासनाने कार्यक्रम तयार करणे
- कलम 27 (1) अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार

६ आले गणपती

श्रीगणेशांच्या मातीवर आणखी एका महत्त्वपूर्ण फुलाचा समावेश असतो. आयनाचे फूल, आयीन वा ऐन वृक्षाची ही फुले गणेशोत्सवात ठिकठिकाणच्या बाजारात मोठ्या प्रमाणावर दिसू लागतात. ही फुले मातीवर लावण्याचे कारण काय असेल, असा कुणालाही प्रश्न पडतो. 'वास्तुशास्त्राच्या दृष्टीने लाकडांच्या घराच्या बांधणीत आयीन वृक्षाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

९ आट्टम : मुखवट्यामागचं वास्तव

आट्टम या आनंद एकार्शी दिग्दर्शित मल्याळम चित्रपटात कोणी हिरो नाही की हिरोईन नाही. हा चित्रपट रहस्यपट किंवा थरारपटही नाही, यात हिंसा नाही किंवा लैंगिकता नाही. एकामागून एक घडणाऱ्या वेगवान घटना नाहीत की, ॲक्शन सिन्स नाहीत. तरीही हा चित्रपट तुम्हाला अक्षरशः खुर्चीला खिळवून ठेवतो. चित्रपट संपल्यानंतरही तुम्ही त्यातून बाहेर पडू शकत नाही. हा चित्रपट तुम्हाला विचार करायला लावतो.

१२ प्रकाशवाटा सारीकडे...

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' अशी म्हण आपल्याकडे आहे. दिवाळी सण येतोच मुळी आनंद, उत्साह आणि नवी उमेद घेऊन. महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने पाच दिवस चालणारा हा आनंदसोहळा अन्य राज्यांमध्येही उत्साहात साजरा होतो. प्रांतोप्रांतीच्या दिवाळीची ही सफर.

१४ भरडधान्यांचे आरोग्यासाठीचे उपयोग

भरडधान्यांचा आरोग्यासाठीचा ऊपयोग, शेकडो वर्षांपासून आयुर्वेदामध्ये सांगितला आहे व केला गेला आहे. भरडधान्यात, ज्वारी, बाजरी, राजगिरा, कोद्रो, कुटकी, राळा, नाचणी व वरई ही धान्य मुख्यतः पिकवली जातात. या पिकांमध्ये भरपूर पौष्टिक द्रव्ये असतात. ज्यामुळे आरोग्य अबाधित राहू शकते.

२८ सहकारी आले धावून

एखादा प्रसंग असा घडतो की, आपण संकटाच्या दरीत कोसळतो; पण अशा वेळी आपले जीवाभावाचे सहकारी येतात आणि आपली सुखरूप सुटका करतात.

३० ई-पेपर/ई-बुक

प्राचीन काळी लिहिण्याची साधने नव्हती, तेव्हा दगडावर, ताम्रपटावर, भूर्जपत्रावर लिहिण्याची पद्धत होती. त्यानंतर छपाईचा शोध लागल्यावर पेपरवर लिहिण्याची पद्धत सुरू झाली. यासाठी लाकडाच्या लगद्याचा उपयोग केला जातो. या पद्धतीत पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो. तसेच दळणवळणातही खर्च होतो.

आले गणपती	६	कविता	२२-२३
मी गणेश बोलतोय.../ मोदक पुराण	८	लक्ष्मीविलास पॅलेस बडोदा	२४
आट्टम : मुखवट्यामागचं वास्तव	९	यशाची रेसिपी	२७
धोकादायक इमारती : संरचनात्मक तपासणी आणि पुनर्बांधणी	१०	सहकारी आले धावून	२८
सेवानिवृत्तीचे दिवस आणि आठवणी	११	कचरा व्यवस्थापन	२९
प्रकाशवाटा सारीकडे...	१२	ई-पेपर/ई-बुक	३०
भरडधान्यांचे आरोग्यासाठीचे उपयोग	१४	अन्नदाता सुखी भव्	३१
वारकऱ्यांच्या हृदयात उमटलेला आनंदस्पर्श	१६	हरवलेली परंपरा	३२
राज्यातील सर्व शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे शासनाचे आवाहन	१७	रामानुजन आणि पालक	३४
देवनागरी भाग -४	१८	संस्कृत सुभाषित / विठ्ठल रखुमाई	३५
सलाम लालपरी!	१९	प्रभावी संवादाची गरज	३६
		हास्य नगरी	३७
		बोल हरिपाठाचे.../ काही म्हणी, काही उखाणे...	३८

वर्ष ३ रे । अंक ६ । सप्टेंबर २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

आपलं मंत्रालय

संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

प्रतिक्रियांचे स्वागत

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

ग्रामीण महिला उद्योजिकांसाठी नवतेजस्विनी प्रदर्शन यशस्वी

ग्रामीण भागातील महिला स्वयंसाहाय्यता गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना शहरी ग्राहकांशी थेट जोडून विक्रीला चालना देण्यासाठी आयोजित नवतेजस्विनी प्रदर्शन मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात यशस्वीपणे पार पडले. प्रदर्शन २३ ते २६ सप्टेंबर दरम्यान सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत संपन्न झाले आणि त्याला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महिला व बालविकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) द्वारे आयोजित या प्रदर्शनाचे उद्दिष्ट ग्रामीण महिला उद्योजिकांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे आणि त्यांच्या उत्पादित वस्तूंचे शहरी ग्राहकांपर्यंत थेट वितरण सुनिश्चित करणे हा होता. या कार्यक्रमाद्वारे महिलांच्या मेहनतीला व सार्वजनिक ओळखीला संधी उपलब्ध करून देण्यात आली.

प्रदर्शनात एकूण १२ स्टॉल्स उभारण्यात आले होते. ज्यामध्ये विविध जिल्ह्यांतील महिला उद्योजिकांनी तयार केलेली उत्पादने सादर केली गेली. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील बांबूच्या आकर्षक हस्तकला वस्तू, गोंदियाच्या लाखेच्या बांगड्या, वारली कलेतील चित्रे आणि विविध कलात्मक वस्तू; तसेच पौष्टिक व चविष्ट मिलेटयुक्त पदार्थ यांचा समावेश होता. या वस्तूंमधून ग्रामीण महिलांच्या सृजनशीलतेचे आणि कुशलतेचे दर्शन घडले. प्रत्येक स्टॉलवर उत्पादनांची गुणवत्ता, कलात्मक सजावट आणि ग्राहकांसाठी सादरीकरण या बाबींवर विशेष भर देण्यात आला होता.

प्रदर्शनाला महिला व बालविकास विभागाच्या मंत्री कु. आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डिकर आणि सचिव डॉ. अनुप कुमार यादव यांनी भेट देऊन महिला उद्योजिकांना प्रोत्साहन दिले. तसेच त्यांनी महिलांच्या मेहनतीला, त्यांच्यातील सृजनशीलतेला आणि सामाजिक आर्थिक विकासात त्यांच्या योगदानाला मान्यता दिली.

ग्राहकांची उपस्थिती आणि सक्रिय खरेदी या प्रदर्शनासाठी विशेष ठरली. मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी; तसेच मंत्रालयात कामासाठी आलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने स्टॉल्सला भेटी दिल्या, उत्पादनांची प्रशंसा केली आणि विविध वस्तू खरेदी केल्या. स्टॉल्सच्या सजावटीतून, उत्पादनांच्या गुणवत्तेतून आणि सादरीकरणाच्या पद्धतीतून ग्रामीण महिला उद्योजिकांच्या मेहनतीचा आणि कलात्मकतेचा स्पष्ट ठसा उमटला. ग्राहकांनी त्यांच्या उत्पादनांना मिळालेली मान्यता, त्यांना आत्मविश्वास आणि पुढील उद्यमशीलतेस प्रोत्साहन देणारी ठरली.

या यशस्वी प्रदर्शनातून ग्रामीण महिला उद्योजिकांच्या आर्थिक स्वावलंबनाला बळकटी मिळाली आहे. तसेच अशा प्रकारच्या कार्यक्रमांद्वारे महिलांच्या सामाजिक व आर्थिक सशक्तीकरणासाठी व्यापक संधी उपलब्ध होत असल्याचे अधोरेखित झाले. भविष्यात या कार्यक्रमांचे अधिक व्यापक स्वरूपात आयोजन करून महिला उद्योजिकांच्या उत्पादनांचा विस्तृत बाजारपेठेत प्रसार करण्यास प्रोत्साहन दिले जाण्याची अपेक्षा आहे.

माविमच्या माध्यमातून आयोजित हे प्रदर्शन ग्रामीण महिला उद्योजिकांच्या सृजनशीलतेला, आर्थिक स्वावलंबनाला आणि समाजातील सहभागाला प्रोत्साहन देणारे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. या यशस्वी आयोजनातून महिलांच्या मेहनतीचे कौतुक व सार्वजनिक ओळख निर्माण झाली आहे. ज्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेतही वाढ होण्याची शक्यता आहे.

शब्दांचा प्रवास...

खरेतर जीवन हे फक्त दिवसांची बेरीज नसून तो अनुभवांचा, विचारांचा, भावनांचा आणि संवादाचा अखंड प्रवाह आहे. प्रत्येक अनुभव आपल्या जगण्याला नवा अर्थ देतो. सुख असो वा दुःख आपल्या मनात नवा दृष्टिकोन निर्माण करतात. विचार ही मनाची दिशा ठरवतात. सकारात्मक विचार मनाला उभारी देतात, तर नकारात्मकतेतूनही खूप काही शिकायला मिळते. भावनांच्या रंगीबेरंगी छटा नात्यांना उबदार बनवतात. त्यामुळे संवाद हा त्या नात्यांचा श्वास ठरतो. मनापासून केलेला कोणताही संवाद विश्वासाची पायरी रचतो आणि समाजातील प्रत्येक घटकांशी जुळवून घेण्याची ताकद देतो.

जीवनाच्या वाटेवर येणारी संकटे, संघर्ष, यशापयश या सगळ्याच गोष्टी आयुष्याला अधिक सखोल करतात. फक्त जगणे पुरेसे नसते; त्या जगण्यातला अर्थ शोधणे, प्रत्येक क्षणातील सौंदर्य जाणणे आणि त्याला मनात साठवून ठेवणे हेच खरे आयुष्य आहे. म्हणूनच माणसाचा प्रवास हा दिनक्रमापुरता मर्यादित राहत नाही. तो आपल्या अनुभवांच्या गाठींनी, भावनांच्या स्पर्शाने, विचारांच्या प्रकाशाने आणि संवादांच्या गुंफणीतून अधिक सुंदर व अर्थपूर्ण बनतो.

जीवनात अनेक गोष्टी असतात, ज्या आपल्याला जगण्याची खरी चव देतात. त्यामध्ये लिहिणे, वाचणे, फिरणे आणि व्यक्त होणे या चार गोष्टी विशेषत्वाने अधोरेखित कराव्या लागतात. पुस्तकांच्या पानांमध्ये जगण्याचं तत्त्वज्ञान सामावलेले असते. वाचनातून नव्या संस्कृती, नवे विचार आणि नव्या दृष्टिकोनाशी आपली गाठ पडते. लेखन ही तर स्वतःला ओळखण्याची प्रक्रिया आहे. मनातील गोंधळ, आनंद, वेदना किंवा उमेद यांना शब्द देताना आपण स्वतःशीच नव्याने संवाद साधतो. प्रवास तर माणसाला केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे, तर मानसिकदृष्ट्याही अधिक विशाल करतो आणि व्यक्त होणे म्हणजे आपल्या मनातील भावनांना समाजाशी जोडण्याचा सर्वात सुंदर मार्ग.

आपल्या या मासिकाचे स्वरूपही याच प्रवासाशी जोडलेले आहे. एखाद्या हलक्या-फुलक्या कवितेचा ओघ वाचताना वाचकाच्या चेहऱ्यावर हसू फुलते, तर प्रवासवर्णनातून अनोळखी प्रदेशाशी मैत्री जुळते. ‘सुसंवादाचे महत्त्व’ हा लेख आपल्याला संवादातील सौंदर्याची आठवण करून देतो. भरडधान्याचे पोषणमूल्य, जे आपल्या पूर्वजांनी जाणले होते, तेच आज पुन्हा आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरत आहे. आधुनिक ई-पेपरच्या माध्यमातून जग किती जवळ आले आहे आणि अशा तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचे भांडार अधिक समृद्ध होते.

‘आपलं मंत्रालय’ म्हणजे फक्त काही पानांचा संग्रह नाही; तर तो एक प्रवास आहे. वाचकाला विचार, ज्ञान, अनुभव, प्रेरणा आणि आनंद यांच्याशी जोडणारा सेतू आहे.

आपल्या हाती आलेला हा अंक केवळ वाचनासाठी नाही, तर मनाला स्पर्श करणारा आणि विचारांना चालना देणारा अनुभव आहे. लेख, कविता, माहितीपर लिखाण आणि विचारमंथन या सर्वांमधून वाचकांच्या भावविश्वाला भिडणे, हेच आमचे ध्येय आहे, कारण शब्दांमधूनच नवे विचार जन्म घेतात आणि त्यातूनच समाजाला पुढची दिशा मिळते. आपल्याला हा अंक नक्की आवडेल, अशी खात्री आहे.

ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)

आले गणपती

चंद्रशेखर महादेव पालव

गणरायांच्या मस्तकावरील माटीवर विषबाधा दूर करणारे 'कवंडाळ', काट्याने काटा दूर करणारी अग्निशिखा, सहजप्रसूती देणारी 'कळलावी', घराला उपयुक्त ठरणाऱ्या आयनाची फुले जणू भगवंताची.

बऱ्याच वनस्पती या देवतांचीच स्वरूपे आहेत. 'मलयानिळ सुपरिमळ' म्हणून प्रसिद्ध असलेला चंदन. ज्ञानदेवांनी या वृक्षाच्या मुळापासून शाखा, पल्लवांपर्यंत सर्व सु–फळ म्हणूनच पाहिले आहे. अशी चंदनपर्णे आपल्या घरच्या मठीत पसरली, तर सुगंधाने वातावरण प्रफुल्लित होईल. म्हणून चंदनपर्णांना श्रीगणेश माटीत समाविष्ट केलेले आहे.

कर्णकुंडले, शबरीने श्रीराम चरणांवर वाहिलेले 'पडवाड', पठारवजा जागेत उगवणारी हरणं हे त्याचे वनस्पतीजन्य रूपही पवित्रतम ब्रह्मदेवकन्या आहे.

श्रीगणेशांच्या माटीवर जे मजेशीर फळ आहे, ते म्हणजे कवंडळ, ही वेलीची फळे गणेशोत्सवात बाजारात मिळतातच. कवंडळाला आकर्षक रंग असतो. अगदी टळटळीत! लाल, पिवळा, हिरवा. या फळाचा उपयोग थक्क करणारा आहे. या कवंडळाचा वेल दृष्टिदोष असणाऱ्यांच्या गळ्यात बांधला जायचा..दृष्टिदोष जायचा..

भावार्थ रामायणात श्रीसंत एकनाथ महाराजांनी या फळाचे माहात्म्य सांगितले आहे. सीतामातेचे अश्रू या फळावर पडले. म्हणून हे फळ पवित्र बनले. मूलतः अत्यंत विषारी फळ; परंतु सेवनाने कोणी मृत्यू पावल्याचे ऐकिवात नाही. कारण हे फुटले की, निघणारा गर अतिउष्ण विष्ठेप्रमाणे अधिक दुर्गंध पसरवतो. या फळाचा वेल चक्षुरोगावर गळ्यात बांधतात. पशुपक्ष्यांना जन्मजात या फळाच्या गुणाचे ज्ञान आहे. त्यामुळे गरूड ही फळे खातो. नेहमी विषारी सर्प खाणाऱ्या गरूडाला कधी सर्पविष चढल्याचे कुणी ऐकले आहे का? त्याने हे विषारी फळ पचवले असल्याने ते प्रतिविष बनून सर्पाचे विष उतरते. पूर्वी आयुर्वेदिक साणसीत कवंडळाची बी असायची. एक वर्षाची एक मात्रा याप्रमाणे बी उगाळून चाटण द्यायचे. उद्देश हा की, कोणतीही विषबाधा होऊ नये.

अग्निशिखा

श्रीगणेशांना प्रिय व आपल्या भक्तांना बुद्धी देऊन त्या बुद्धिदात्याने आणखी एक वनस्पती आपल्या माटीवर बांधून घेतली, ती म्हणजे अग्निशिखा. ग्रामीण भाषेत याला वाघनखे असेही म्हणतात.

धन्य धन्य वृक्षवल्ली औषधी । श्रीराम विचरे ज्यां सन्निधीं । ते पावन गा त्रिशुद्धी । कृपानिधी श्रीगणनाथ ।। हरिविजय ग्रंथात याला बाललेणे म्हटले आहे. श्रीमहाविष्णू हे बाळकृष्ण रूप धारणकर्ते झाले. प्रसंगवश वसुदेवाने त्यांना गोकुळात नंदाघरी आणून सोडले. यशोदामातेने बालकाच्या गळ्यात वाघनखाला सोन्यात मढवून घातले. बाळकृष्ण मोठा झाल्यावर पुढील कार्यार्थ मथुरेत नियाला, तेव्हा त्याने यशोदामातेच्या हाती हेच वाघनख देऊन सांगितले. 'आई, माझी तुला आठवण येईल, तेव्हा याच बाललेण्यात तुला दर्शन देईन.' हेच वाघनख अग्निशिखा निसर्गरूपात वनस्पती फुलात परावर्तित होऊन, आजही सर्वत्र श्रीबाळकृष्णाची आठवण म्हणून दर्शन देत आहे.

तसे पाहता वाघनखाचा वेल असतो. हा अतिशय विषारी आहे. हातापायात विषारी काटा गेल्यास या वाघनखाच्या वेलाचे मूळ गोमूत्रात उगाळून त्या जागेवर लावल्यास विषारी काटा बाहेर पडतो. विषाने विष बाहेर पडते. त्याचप्रमाणे याचे आणखी एक नाव आहे 'कळलावी'. सुखाने प्रसूती होण्यासाठी याचा कंद उगाळून विशिष्ट प्रकारे लेप देण्याची पद्धती होती; पण औषधाऐवजी त्याचा दुरुपयोग होण्याचा संभव अलीकडे होऊ लागल्याने त्याचा उल्लेख करणे टाळतो.

भगवंतांची कुंडले

श्रीगणेशांच्या माटीवर आणखी एका महत्त्वपूर्ण फुलाचा समावेश असतो. आयनाचे फूल, आयीन वा ऐन वृक्षाची ही फुले गणेशोत्सवात ठिकठिकाणच्या बाजारात मोठ्या प्रमाणावर दिसू लागतात. ही फुले माटीवर लावण्याचे कारण काय असेल, असा कुणालाही प्रश्न पडतो. 'वास्तुशास्त्राच्या दृष्टीने लाकडांच्या घराच्या बांधणीत आयीन वृक्षाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. घराच्या सर्वात मध्यभागावर असलेले पाशिट नामे ओळखले जाणारे लाकूड आयीन वृक्षाचेच असायचे. संपूर्ण घराचा डोलारा पूर्णपणे नियंत्रित होतो, तो या लाकडाच्या भरवशावर. याज्ञिक वृक्षाप्रमाणे याला मान आहे. या लाकडात अग्नी टिकून असते. तर या वृक्षाच्या फुलांना विश्वव्यापी भगवंताची कर्णकुंडले म्हणून पाहिले जाते. या फुलांकडे एक वेगळेच सौंदर्य आहे. वानर हे फूल अती आवडीने औषध म्हणून खातात.

यानंतर माटीवर शोभणारी पाने म्हणजे षडवाड. सर्वसामान्यतः याचे फारसे कुणी नावही ऐकलेले नसेल. सत्त्वगुणांनी पांढरा आणि रजगुणांनी लालसरपणा दर्शवणारे हे एक पानफूल आहे. पानफूल यासाठी म्हणायचे, कारण श्रीरामचंद्रांनी वनवास काळात शबरीला जेव्हा दर्शन दिले तेव्हा तिच्या उडालेल्या गडबडीत ऐनवेळी फुले कोठून आणावी, म्हणून श्रीरामचरणी हीच फळे वाहिली. श्रीरघुराम यांच्या चरणांचे पूजन शबरीने केले. त्या पवित्र झालेल्या पानांना श्रीगणेश माटीत स्थान मिळाले आहे. शबरीच्या रामभक्तीचा आदर राखून कोकणवासीयांनी तिच्या पानफुलांना मोरयाच्या संमतीने त्याच्या मस्तकावरील माटीत स्थान दिले.

श्रीगणेश माटी

एकंदर श्रीगणेशाची माटी ही भगवंताच्या वैभवाचे वनशोभेत रंगलेले जीवन दर्शवते. पडवाडाचे पाहा, त्याचे पांढरे पान म्हणजे षडानन व लाल पान म्हणजे स्वतः श्रीगणेश असे बंधुमाटीवर उपस्थित असतात.

अशा प्रकारचे नेमके अर्थ कोकणातील या अनोख्या परंपरेमागे आहे. याचे वैशिष्ट्य असे की, ही दिव्यपरंपरा पालन करणाऱ्यांच्या हाती कधी लेखणी किंवा पुस्तक नव्हते; पण शुद्ध दृष्टीने त्यांनी नेमके ते टिपले. पुराणकाळातील ग्रंथकारांनी सांगितलेली भक्ती तशीच अव्याहत ठेवली. संस्कारांचे भान ठेवले नि सर्वांची सुदृढताही राखली.

श्रीगणेशांच्या माटीचे हे वैभव बांधण्यासाठी सुतळी, दोर वा तारेचा वापर कोकणवासीय करत नाही, तर किनळी नामक वृक्षाचे दोर काढून त्याद्वारेच ती बांधण्याची पद्धती आहे. विशेष म्हणजे नवीन लग्न झालेल्या तरुणास गाईगुरे चरावयाला नेताना थोरा-मोठ्यांकडून सूचना मिळायची; 'येताना किनळीचे दोर काढून आणा. उत्सव आला आहे. माटी तुलाच बांधावयाची आहे. हा आग्रह कशासाठी असावा? 'लगीन झालेल्यान् ढोराक् जाताना किनळीचे दोर आणुचेत हा.' यावर तो गडी सोपवलेले काम पार पाडायचे म्हणून निघायचा. किनळीच्या दोराला ओलसरपणा असतो. किनळीच्या दोराने माटी बांधताना, साल सोलताना दाताने खेचतात. त्यामुळे तो रस तोंडात जातो. हेही त्या पुरुषासाठी उपयुक्त ठरणारे असते. गुरे हाकताना हातात काठी घ्यायची तीही बहुदा किनळीचीच असायची. ही झाली एक बाजू, किनळीच्या जाड्या दोराने प्रसंगी किंटलाचा भारही उचलला जातो; पण हाच दोर दसरा दिवाळीत कुजून सहज मातीत मिसळून जातो. म्हणजे पर्यावरणाची हानी कधीच होत नाही. या सर्वच गोष्टींचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, या संपूर्ण रचनापद्धतीमध्ये समाजव्यवस्थेचे उत्तम दर्शन जुन्या जाणत्यांनी घडवले आहे. एवढेच नव्हे तर, श्रीगणेशोत्सवासाठी केल्या जाणाऱ्या भाज्या, त्याची मांडणी, श्रीगणेशांना विसर्जनावेळी आईकडे परतताना दिले जाणारे 'साटले मोटले' हे हळदीच्या पानात बांधून दिला जाणारा नैवेद्य, चतुर्थीतले वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ या सर्व विषयांचा आवाका फार मोठा आहे. या निमित्ताने आम्ही श्रीगणेशापासूनचे एक फार मोठेच दालन गणेशभक्तांसाठी येथे खुले करून ठेवत आहोत. या संपूर्ण ज्ञानामृताचे वैभव पोळजी गुरुजींच्या ज्ञानपोतडीतून सर्वांपर्यंत आले आहे, ही त्या बुद्धिदात्या मोरयाचीच प्रेरणा आहे. वाचकवर्गाने आपल्या मित्रमंडळींपर्यंत हा विषय न्यावा. आपणास माहीत असलेल्या प्रथा परंपरांचाही येथे आवर्जून उल्लेख करावा, ही सर्वांना विनंती.

(सप्टेंबर २०१८ मधून पुनर्प्रकाशित.)

(निवृत्त आरेखक श्रेणी-१, रेखाचित्रशाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)

मी गणेश बोलतोय...

अजय भोसले

मी गणेश बोलतोय.... तुमचा लाडका बाप्पा.... तुम्ही मला आवडीनं पुजता .... बुद्धीची देवता म्हणून... अनेकदा बुद्धी बाजूला ठेवून.... कशी समजूत घालू बाबा तुमची... चार पुस्तकं ठेवली असती माझ्यासमोर तर रात्रभर वाचत बसलो असतो... जीव घुसमटून गेलाय रे... या अलंकारांनी, हारांनी... धूप, अगरबत्त्या.... रसायनयुक्त सुगंध आणि अजून कसले साज माझ्या अंगावर लादलेत त्यांनी...; पण तुम्ही काय ऐकणार नाहीत... कर्ज काढून सण साजरे कराल.... अरे बघा जरा आजूबाजूला... श्रीमंत लोकांकडे... सेलिब्रेटींकडे... सहज लाखो रुपये उधळू शकतात...; पण किती साधी मूर्ती स्थापना असते.... तीही पर्यावरणयुक्त... स्पृहाजी गणेश बीजाची संकल्पना कळकळीने रुजवू पाहातायेत... काय आहे गणेश बीज? मातीचा गणेश... बीजाचे अलंकार ल्यायलेला... त्याची स्थापना कुंडीत करायची.... विसर्जन कुंडीतच.... त्यातून उगवणाऱ्या रोपाचा सुगंध तुमच्या महागड्या सुगंधालाही नाही.... माझं ऐकायचं तर ऐका... निदान तुमच्या श्रद्धा दुसऱ्यांवर लादू नका... त्यातून क्लेश उत्पन्न होतात... पवित्र वातावरण कलुषित होतं... निसर्ग/देव फक्त पवित्र, निर्मळ, मंगल वातावरणात वास करतात.... तुक्याने केली ती भक्ती... फक्त. वाणीने.... तुम्ही आज काय करता आहात... परंपरेच्या नावाखाली घोडे उधळताय.... तुक्यानं , ज्ञानानं सांगितलेली ज्ञानार्जनाची परंपरा कुठे गेली.... कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन... कर्माची परंपरा आपली... कर्मकांडाची नाही... कर्मच केले नाहीत तर कसले नवस सफल होणार... मी निर्गुण, निराकार... कर्कश आवाजात भजनं करताना त्याचा अर्थ तरी समजून घ्या... निसर्ग म्हणजे देव... देव म्हणजे... निसर्ग त्याला दुसरा आकार नाही... तुम्ही झाडं तोडलीत की तो पूर आणतो... तुम्ही पाणी वाया घालवलंत की वैराण करतो... तुम्ही निसर्गाला वरचढ होऊ पाहता... तो ममतेने सांगू पाहतो काही... झुळझुळणाऱ्या वाऱ्यातून.... नाही ऐकत तुम्ही... मग देतो एक रट्टा... शेतकऱ्याच्या मालाला भाव देताना.... गरीब भाजीवालीची भाजी घेताना... तुम्ही घासाघीस करता आणि ज्याचा मला काहीच उपयोग नाही, अशा महागड्या निर्जीव वस्तू माझ्यावर लादून माझा जीव नकोसा करता... संतांनी सांगितलं देव माणसात, देव निसर्गात... तुम्हाला ऐकायचं तर ऐका; पण बाबांनो निदान या निर्जीव अलंकारांनी माझा जीव घुसमटवू नका. जमलं तर द्या दोन पुस्तकं गरजूंना... जमलं तर द्या भाव शेतकऱ्याच्या मालाला... जमलं तर लावा दोन रोपटी अंगणात... बुद्धीदेवता प्रसन्न व्हावी असं मनापासून वाटत असेल, तर बुद्धीची जोपासना करा... मला अलंकार नको, पुस्तक द्या... मला धूप नको, रोपटं द्या...

(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)

मोदक पुराण

शिल्पा नातू

गोड पदार्थांपासून मी कोसभर लांब असते; पण एका पदार्थाचा मात्र या सगळ्याला अपवाद आहे. तो म्हणजे उकडीचा मोदक.

एखाद्-दुसराच पण उकडीचा मोदक आवडीने खाल्ला जातो. मोदक मनापासून आवडत असल्यामुळे मोदकाचे सारण करणे, उकड काढणे आणि कलाकुसर करत मोदक वळणे यात वेगळीच मजा असते. दोन्ही हात आणि हातांच्या पाचही बोटांचा वापर करत मोदक वळताना मला त्यात पंचप्राण ओतल्यासारखेच वाटतात. प्रत्येक मोदक अधिकाधिक सुबक, सरस कसा होईल, याचा विचार करता-करता मोदकांचा घाट पटकन संपतो. एका बाजूला मोदक करत असताना दुसरीकडे बाकीचा स्वयंपाक सुरू असतोच.

मोदक करण्याचा अनुभव शून्य असताना लग्न झाले. बुद्धीची देवता असलेल्या गणरायाला माझी मोदक करण्याची इच्छा आणि खाण्याची आवड नक्कीच कळली असेल. म्हणूनच घरी गणपती बाप्पा आणणारे सासर मिळाले आणि तो मंगलमूर्ती दरवर्षी मी केलेल्या मोदकांच्या नैवेद्याचा आस्वाद घेऊ लागला. मला नैवेद्य करण्यात आणि त्याला नैवेद्य खाण्यात मोद होऊ लागला.

मोदकाच्या सारणात गूळ-खोबऱ्याबरोबर सुका मेवा, वेलची पूड, जायफळ असे विविध प्रकार घालून त्याची लज्जत वाढवणे, कधी बासमती, तर कधी आंबेमोहोर तांदळाची उकड वापरून रुची वाढवणे, मोदकपात्रात मोदक शिजवताना हळदीचं, काळ्याचं पान वापरून अधिक पौष्टिक करणे असे प्रयोग करण्यात मला मजा वाटू लागली. मोदकपात्रातून वाफाळलेले मोदक काढून त्यावर साजूक तुपाची धार सोडून गणरायाला नैवेद्य दाखवायचा आणि मोदकांचा सुगंध घरभर दरवळला की, मस्तपैकी पानं वाढायची. घरातली मंडळी जेवायला बसल्यानंतर मनसोक्तपणे, चवीने मोदक खाताना पाहिलं की होणारी तृप्ती वर्णनापलीकडची असते.

(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

आट्टम : मुखवट्यामागचं वास्तव

प्रशांत साजणीकर

आट्टम या आनंद एकार्शी दिग्दर्शित मल्याळम चित्रपटात कोणी हिरो नाही की हिरोईन नाही. हा चित्रपट रहस्यपट किंवा थरारपटही नाही, यात हिंसा नाही किंवा लैंगिकता नाही. एकामागून एक घडणाऱ्या वेगवान घटना नाहीत की, ॲक्शन सिन्स नाहीत. तरीही हा चित्रपट तुम्हाला अक्षरशः खुर्चीला खिळवून ठेवतो. चित्रपट संपल्यानंतरही तुम्ही त्यातून बाहेर पडू शकत नाही. हा चित्रपट तुम्हाला विचार करायला लावतो.

'आट्टम' या चित्रपटाचं कथासूत्र सांगायचं झालं, तर दोन-तीन ओळी पुरतील. नाटक करणाऱ्या १२ हौशी कलाकारांच्या संचात एका रात्री पार्टीनंतर त्यांच्यातल्या एकमेव महिला कलाकाराच्या विनयभंगाच्या प्रसंगानंतर वादळ येतं. सगळे ११ पुरुष कलाकार तातडीची बैठक बोलावून संशयित कलाकाराला संचातून बाहेर काढण्याचा ठराव करण्यासाठी एकत्र जमतात. यानंतर त्यांच्यात होणारा संवाद आणि काही घटना म्हणजे हा चित्रपट.

मुळात हे सगळे हौशी कलाकार. कोणी शेफ आहे तर कोणी प्लंबींगचे काम करतोय, तर कोणी पुजारी आहे. आपापले काम सांभाळून कलेच्या प्रेमापोटी ही सगळी मंडळी आरंगू नावाचा कलामंच चालवतात. अनेक वर्ष एकत्र असल्याने त्यांच्या एकमेकांच्या संबधांमध्ये ताणतणावही आहेत. संशयित कलाकाराला संचातून बाहेर काढण्यासाठी त्यातल्याच एकाच्या घरी सगळे पुरुष कलाकार जमतात. त्यांच्यात झालेल्या घटनेबद्दल चर्चा सुरू होते. या चर्चेमधूनच एकूण त्या कलाकारांची पुरुषी मानसिकता, त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, प्रत्येकाचा स्वार्थीपणा असे अनेक मुखवटे उघडे पडत जातात.

आनंद एकार्शी या तरुण दिग्दर्शकाने त्याच्या पदार्पणाच्या प्रयत्नातच एक अतिशय दर्जेदार चित्रपट दिला आहे. या चित्रपटातील बहुतांश कलाकार दिग्दर्शकाचे मित्र असून ते हौशी नाट्य कलाकार आहेत. या सगळ्या मित्रांना घेऊन एके दिवशी सहलीला गेल्यावर या सगळ्यांना घेऊन एखादा चित्रपट काढायचा असं ठरलं आणि या चित्रपटाची कल्पना सुचली. कलाकार नवखे असल्याने चित्रपटात कोणताही उणेपणा न येता उलट मूळ विषयाला जास्त न्याय मिळाल्याचे दिसते.

सर्वच कलाकारांनी उत्तम कामे केली आहेत. त्यात अंजलीची भूमिका करणाऱ्या झरीन शिहाबचं विशेष कौतुक. एक मनस्वी; पण बिनधास्त कलाकार, सहकलाकाराकडून झालेला विनयभंग. त्यामुळे विश्वासाला गेलेला तडा, आलेली उद्विग्नता, त्यानंतर होणाऱ्या घडामोडींना एक स्त्री म्हणून ती ज्या प्रकारे सामोरी जाते तो सारा प्रवास तिने कमाल ताकदीने उभा केला आहे.

आट्टम म्हणजे नाटक. नाटकात जसे मुखवटे असतात, त्याचप्रमाणे वास्तवातही माणसं अनेक मुखवटे घेऊन जगत असतात. एखादा कसोटी घेणारा प्रसंग येईपर्यंत या मुखवट्यांना तडे जात नाहीत. विशेषतः स्त्री आणि पुरुष संबंधात या मुखवट्यांना वेगळे महत्त्व आहे. आट्टम नेमका याच पुरुषी मानसिकतेवर अतिशय मार्मिक आणि भेदक भाष्य करतो आणि ते करत असताना कुठेही दिग्दर्शकाला हिंसा, भडकपणा, लैंगिकता किंवा बीभत्सतेचा आश्रय घ्यावा लागत नाही, हे दिग्दर्शक आनंद एकार्शी यांचे मोठे यश म्हणावे लागेल.

हा चित्रपट मूळतः संवादप्रधान आहे. जेमतेम तीन-चार आऊटडोअर लोकेशन्स आहेत. बहुतांश चित्रपट एका घरात घडताना दिसतो. चित्रपट पाहताना 'एक रुका हुवा फैसला'ची आठवण आली, तरी हा चेंबर ड्रामा नाही. संवाद, चित्रपटाची मांडणी, संकलन यामुळे चित्रपटाची बांधणी घट्ट झाली असून प्रेक्षकाला सतत गुंतवून ठेवत असताना त्यातली रंजकता जपून ठेवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

कोणताही चित्रपट पाहत असताना आपण नकळत त्यातल्या पात्रांशी जोडले जातो. कथा जसजशी पुढे जाते, तसतसे आपण ठोकताळे बांधत जातो की, पुढे काय होणार. पडद्यावर चित्रपट सुरू असताना आपल्या मनातही एक पट उलगडत असतो. मात्र आट्टम सतत तुमचे ठोकताळे उधळून लावत तुम्हाला जरा कुठे समजतंय, असं वाटेपर्यंत पुढचा धक्का देत राहतो. दोषी कोण हे ओळखण्याच्या या खेळात आपणही सहभागी होतो. येथेही आपण चकवा खातो. मग लक्षात येतं की, दिग्दर्शकाला जे सांगायचे आहे, त्याचे प्रतल यापेक्षा खूप मोठे आहे. येथे आनंद एकार्शी यांचे वेगळेपण उठून दिसते. शेवटच्या दृश्यापर्यंत उत्कंठता टिकवून ठेवण्यात 'आट्टम' यशस्वी ठरला आहे. चित्रपटाचा शेवटही अतिशय वेगळा आणि विचार करायला प्रवृत्त करणारा आहे.

महिलांना केंद्रस्थानी ठेवून संवेदनशील विषयावर दर्जेदार चित्रपट मल्ल्याळम भाषेत निर्माण होत आहेत. आनंद एकार्शी यांनी पदार्पणातच दिग्दर्शित केलेला 'आट्टम' हा त्यापैकी एक. सर्वोत्कृष्ट संकलन, सर्वोत्कृष्ट पटकथा आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट असे राष्ट्रीय पुरस्कार आट्टमला मिळाले आहेत. रसिकांनी चुकवू नये, असा हा चित्रपट आहे. चित्रपट पाहिल्यावरही तुम्ही चित्रपटाविषयी बोलत राहाल, विचार करत राहाल. आट्टम सध्या ॲमेझॉन प्राइमवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

(सहसचिव व सहव्यवस्थापकीय संचालक, फिल्मसिटी, महाराष्ट्र शासन.)

धोकादायक इमारती : संरचनात्मक तपासणी आणि पुनर्बांधणी



धोकादायक इमारती : संरचनात्मक तपासणी आणि पुनर्बांधणी हे रुषभ कर्नावट आणि जमीर लेंगरेकर, अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका लिखित पुस्तक सहकारी सोसायट्यांना उपयुक्त ठरणारे खूप महत्त्वाचे पुस्तक आहे. रुषभ कर्नावट हे पेशाने स्ट्रक्चरल इंजिनीयर आहेत व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा त्यांना दांडगा अनुभव आहे, तर जमीर लेंगरेकर उल्हासनगर, पनवेल, सोलापूर या महानगरपालिकांमध्ये व नगरपरिषद प्रशासन संचालनालय येथे उपायुक्त व अतिरिक्त आयुक्त पदांवर काम केल्याचा उत्तम प्रशासकीय अनुभव असलेले अधिकारी आहेत.

आतापर्यंत या विषयातील अस्सल आणि पद्धतशीर माहिती मराठीत उपलब्ध नव्हती. ती कमतरता या पुस्तकाने भरून काढली आहे. या पुस्तकात केवळ स्ट्रक्चरल ऑडिट म्हणजे काय हे सांगितले गेलेले नाही, तर या विषयाशी संबंधित मानवी पैलूंनादेखील स्पर्श करण्यात आला आहे. त्यामुळे या माहितीला पाठ्यपुस्तकाचे स्वरूप न येता सामान्य वाचकांशी लेखकद्वयींनी साधलेला संवाद असे रूप आले आहे.

पावसाळ्यात इमारती कोसळण्याचे प्रमाण हे अधिक असते. ऊन-वारा-पाऊस यांचा मारा झेलून जीर्ण झालेल्या इमारतींना संजीवनी कशी देता येईल, याची शास्त्रोक्त माहिती या पुस्तकात दिली आहे. या संदर्भात शासकीय नियम काय आहेत? धोकादायक इमारती कोणकोणत्या श्रेणींमध्ये विभागल्या जातात? इमारत धोकादायक आहे हे ठरवण्यासाठी कोणकोणत्या महत्त्वाच्या बाबी विचारात घेतल्या जाव्यात? या इमारतींचे ऑडिट करणाऱ्या इंजिनीयर्सचा दृष्टिकोन काय असावा, अशा सगळ्या संवेदनशील मुद्यांना हे पुस्तक स्पर्श करते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रधान सचिव अशा अनेकांच्या शुभेच्छा या पुस्तकाला लाभल्या आहेत, हा आणखीन एक दुग्धशर्करायोग यानिमित्ताने घडून आला आहे. हा संवेदनशील विषय वाचकांपुढे आणून ग्रंथालीने साहित्यविश्वात मोलाची भर घातली आहे.

टीम आपलं मंत्रालय



सेवानिवृत्तीचे दिवस आणि आठवणी

सुभाष नागप

मी ३१ मे २०२५ ला नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालो. माझी अर्धी सेवा मंत्रालय इमारत व प्रशासकीय भवन इमारत येथे झाली. येथे मला जी एनर्जी, उत्साह अनुभवायला मिळाला, तो बाहेरच्या कोणत्याही कार्यालयात अनुभवायला मिळाला नाही. जेव्हा मी अन्य कार्यालयात बदलीने कार्यरत असायचो, त्यावेळी कार्यालयीन कामानिमित्त मंत्रालयात यावे लागायचे, तेव्हा मी ती संधी सोडायचो नाही. दोन वर्षांपूर्वी माझे मित्र श्री. जठार, उपसंचालक (लेखा) माझ्याबरोबर मंत्रालयात आले होते. मी जेव्हा मंत्रालयात प्रवेश केला, तेव्हा माझ्यासमोर येणारी प्रत्येक व्यक्ती किंवा मला पाहणारी प्रत्येक व्यक्ती मला 'नागप साहेब' म्हणून हाक मारताना, मला नमस्कार करताना त्यांनी पाहिली. हे माझ्यासाठी नित्याचे होते, परंतु श्री. जठार यांना नवल वाटले. शेवटी त्यांनी मला विचारले, तुला एवढे लोक कसे ओळखतात? मला कसे ओळखतात ते माहीत नाही, परंतु ओळखतात हे खरे, मला तो परिसर खूप एनर्जी द्यायचा, त्या एनर्जीमुळे मला लोक ओळखत असावेत...*असो..*

माझा पिंड शिकवणाऱ्या माणसाचा. शिकणे, शिकवत राहणे ही माझ्या आयुष्यातील आवडती गोष्ट. मागील २५ वर्षे आयुष्य जगण्याबाबत मी शिकत राहिलो, अनुभवत राहिलो. सेवानिवृत्तीनंतर हे काम करायचे हे नक्की झाले होते. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर काय? हा प्रश्न माझ्यासमोर नव्हता.

सेवानिवृत्तीनंतर मी माझ्या कामात गुंतून गेलो. जून, जुलै, ऑगस्ट काही वाटले नाही, परंतु सप्टेंबर महिन्यापासून मला मंत्रालय परिसर तेथील एनर्जी, सहकारी या सर्वांची आठवण डोके वर काढू लागलीच. ती जागा, माणसे, तेथील काम यांची सवय आपले मन व शरीर या दोघांनाही असते. मी विचार करतो की, जर माझी पूर्ण सेवा मंत्रालयात गेली नाही, तसेच माझ्याकडे दिवस कसा घालवावा हा पर्याय आहे, असे असताना मलाही आठवण आलीच, तर ज्यांनी आपली पूर्ण सेवा मंत्रालयात केली; आयुष्याची ३०-३२ वर्षे तेथे घालवली, त्यांची काय अवस्था होऊ शकेल, याची कल्पना मला करता आली. सांगण्याचा मुद्दा हा आठवणी व भावना यांचा. मंत्रालयात पूर्ण सेवा करून सेवानिवृत्त झालेल्यांचे भावनिक जग यामुळे मला कळले. सेवानिवृत्ती ही अपरिहार्य आहे. ती वेळ आली की होणारच, प्रश्न आहे, सेवानिवृत्तीनंतर आपण दरदिवशी कामासाठी घालवलेले किमान १०-१२ तास *(प्रवास धरून)* कसे घालवायचे याचा.

सेवानिवृत्तीच्या वेळी आपले एखादे घर असते, एक कुटुंब असते. मुले शिकून सवरून मार्गी लागलेली असतात. आपले गावही असते, परंतु नोकरीनिमित्त आपण १०-१२ तास गुंतून राहायचो, तसे काहीही नसते. पर्यटन किंवा इतर बाबी हे पर्याय आहेतच, परंतु दैनिकरीत्या नित्याचे असे काही राहत नाही. मुले, नातवंडे, सोसायटीवाले, त्यांच्या-त्यांच्या रुटीनमध्ये व्यस्त; तसेच आपल्या आयुष्याचा जोडीदार काही दिवसांचे १०-१२ तास त्यांचे रुटीन सोडून आपल्याला देऊ शकत नाही. गावी गेले तरी तिथल्या माणसांचेही रुटीन आहेच. सांगायचा मुद्दा कामाच्या दिवसातील प्रत्येक दिवसाच्या या १०-१२ तासांचे करायचे काय याचा...

हे दैनिक १०-१२ तास घालवण्यासाठी मी शिकलेले लाइफ स्किल मला मदत करत आहेच; तसेच माझे यु-ट्यूब, इन्स्टाग्राम, फेसबुकसाठी व्हिडिओ बनवणे, लाइफ कोचिंगबाबत लिखाण करणे या गोष्टी माझ्यासमोरचे दैनिक १०-१२ तास हलके करत आहेत, परंतु या लेखाद्वारे मला असे सांगायचे आहे की, आपल्या प्रत्येकाच्या सेवानिवृत्तीनंतर दिवसाच्या १०-१२ तासांचे काय करायचे, हा प्रश्न उभा राहणार आहेच.

आपण चांगले काम करत आहातच, परंतु त्याबरोबर कामानंतरच्या वेळेत आणि शनिवार, रविवारमध्ये असे एखादे क्षेत्र निवडून ठेवा, ज्यात तुम्हाला आवड आहे, तुमचे मन रमते, ते काहीही असेल, मी मागील २५ वर्षांपासून लाइफ कौशल्ये शिकलो, राग नियंत्रण, चिंता, काळजी, भीती नियंत्रण, आत्मविश्वास, सकारात्मकता, कामाचे नियोजन आणि बरेच काही, त्याचा उपयोग मला झालाच, परंतु कार्यालयीन काम करतानाही झाला व सेवानिवृत्तीनंतर तर जास्त होत आहे. असे एखादे क्षेत्र अवश्य निवडून त्यात कार्यालयीन वेळेनंतर व शनिवार, रविवार गुंतून राहता आले तर बरे.., मुख्य उद्देश सेवानिवृत्तीनंतरचे दैनिक १०-१२ तास कसे घालवावे हा आहे. नंतर नोकरी करायची म्हटले, तर किती वर्षे करणार? केव्हा ना केव्हा थांबावे लागणारच आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतरचे दैनिक १०-१२ तास घालवण्यास मदत करेल, असे काहीतरी आवडीचे क्षेत्र किंवा छंद आतापासूनच पाहून ठेवावा हे उत्तम. ज्याने आयुष्यभर काम केले आहे, त्याच्यासाठी येणारे रिकामेपण काढणे सोपे नाही. त्यामुळे स्वत:साठी, काहीतरी छंद शोधणे आवश्यक आहे, कारण तेच साधन तुम्हाला सेवानिवृत्तीनंतर व्यस्त ठेवेल, मानसिक आनंद देईल.

...असे काही तरी असेल तर उत्तम. ज्यामुळे ऑफिसच्या कामात गुणात्मक वाढ होईल. मला चिंता, काळजी, तणाव, राग चांगला नियंत्रित करता यायचा. तसेच नवीन-नवीन शिकत राहण्याचा मला छंद होता. या छंदाने मला कार्यालयीन कामही चांगले करता आले व सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचा हक्काचा सोबती हेच माझे ज्ञान व छंद आहे. कुटुंबीय, मित्रमंडळी, नातेवाईक, समाज हे सर्व आहे, परंतु प्रत्येक जण आपापल्या रुटीनमध्ये आहे, जसे आपण सेवानिवृत्तीपूर्वी होतो. त्यामुळे आपणही आपल्या रुटीनमध्ये गुंतून राहणे हेचं योग्य..

मंत्रालय, तेथील वातावरण, सहकारी, काम या सर्वांच्या आठवणी येतच राहतील. त्या तशाच जपत पुढे-पुढे चालत राहण्यासाठी छंदाची सोबत असावी, असा माझा अनुभव सांगतो. हा माझा अनुभव आहे. यासाठी सर्वांनी सहमत असावे, असे माझे म्हणणे नाही, परंतु मला माझ्या छंदाने चांगली सोबत दिली आहे. आपणा सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा. अवर सचिव, भोसले साहेब यांचा लेख लिहून देण्याचा आग्रह मोडता आला नाही...*असो..*

(माजी उपसंचालक (लेखा) तथा मोटिवेशनल स्पिकर आणि लाइफ कोच.)

प्रकाशवाटा सारीकडे...

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' अशी म्हण आपल्याकडे आहे. दिवाळी सण येतोच मुळी आनंद, उत्साह आणि नवी उमेद घेऊन. महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने पाच दिवस चालणारा हा आनंदसोहळा अन्य राज्यांमध्येही उत्साहात साजरा होतो. प्रांतोप्रांतीच्या दिवाळीची ही सफर.

मीनल जोगळेकर

महाराष्ट्रात दिवाळी साजरी होते ती सहा दिवस. द्वादशी ते द्वितीया. प्रत्येक दिवसाचे संदर्भ वेगळे, प्रत्येक दिवसाचे महत्त्व वेगळे. आनंद आणि उत्साह मात्र तोच असतो... नवी उमेद देणारा, प्रकाशाच्या वाटा पेरणारा. महाराष्ट्राच्या शेजारील गुजरात, गोवा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक या राज्यांमध्येही दिवाळी त्याच आणि तितक्याच आनंदाने आणि उत्साहाने साजरी होते त्या-त्या राज्यांतील संदर्भांनी. उत्तरेतील राज्यांमध्ये श्रीरामाचा रावणावरील विजय व त्यानंतर भगवान श्रीराम-सीतामैय्या यांच्या अयोध्येतील आगमनाप्रीत्यर्थ दिव्यांची रोषणाई करून उत्सव साजरा होतो. दक्षिणेकडील राज्यांमध्ये श्रीकृष्णाने दुष्ट नरकासुराच्या केलेल्या वधाबद्दल कृतज्ञता म्हणून नरकचतुर्दशी साजरी करण्याची प्रथा आहे. मात्र दिव्यांची आरास, रांगोळ्या, खमंग, स्वादिष्ट पदार्थ, भेटवस्तू

नरकासुराचे दहन

अमृतसरमधील

यांसह कुटुंबीयांनी एकत्र येऊन, आनंद घेण्याचा उत्साह सर्वत्र दिसतो. प्रांतोप्रांतीची दिवाळी असते तरी कशी?

गुजरात : गुजराती माणूस हा मुख्यत: व्यापारउदीम करणारा. त्यामुळे दिवाळीतील लक्ष्मीपूजन, चोपडी पूजनाला इथे विशेष महत्त्व आहे.

गोवा : गोव्यात नरकचतुर्दशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नरकासुराचे मोठाले पुतळे करून त्यांचे दहन करण्याची, तसेच उटणे लावून अभ्यंगस्नान करण्याची इथे प्रथा आहे.

कर्नाटक : कर्नाटकात, विशेषतः मैसूर भागात जनप्रिय बळी राजाचे पूजन केले जाते.

तामिळनाडू : तामिळनाडूत नरकचतुर्दशीचे विशेष महत्त्व आहे. नव्या नवरीच्या माहेरी दिवाळी साजरी करण्याची प्रथा इथे दिसून येते.

आंध्र प्रदेश : हरिकथेचे महत्त्व दिवाळीत खास असते. नरकासुराच्या वधाप्रीत्यर्थ ठिकठिकाणी हरिकथेचे आयोजन करण्यात येते. नरकासुराचा वध करण्यात कृष्णपत्नी सत्यभामेच्या सहभागाप्रति आदर व्यक्त करण्यासाठी सत्यभामेच्या मूर्तीचे पूजनही करण्यात येते.

पश्चिम बंगाल : बंगात दिवाळीच्या दिवसात कालीपूजनाला खूप महत्त्व आहे. मध्यरात्री कालीमातेचे पूजन करण्यात येते.

ओरिसा, आसाम : ओरिसा तसेच आसाम या राज्यांमध्ये दिवाळीची रात्र ही पितरांची रात्र मानण्यात येते. त्यांच्या आत्म्याला सद्‌गती लाभावी म्हणून प्रार्थना केली जाते. दिव्यांची आरास करून त्या उजेडात पितरांचे आत्मे मार्गस्थ होतात, अशी धारणा आहे.

हिमाचल प्रदेश, दिल्ली, उत्तर प्रदेश : या प्रदेशांमध्ये दिवाळीच्या रात्री लक्ष्मीपूजनाला खास महत्त्व असून, काही ठिकाणी शकुनासाठी नातेवाईकांसोबत जुगार खेळण्यात येतो. दुधाने भरलेल्या पात्रात चांदीचा शिक्का बुडवून त्या शिक्क्याने दुधाचे घरभर शिंपण करण्यात येते.

पंजाब : जहांगिराच्या तावडीतून सुटकेनंतर गुरू गोविंदजींचे दिवाळीत अमृतसरमधील सुवर्णमंदिरात झालेले आगमन, सुवर्णमंदिरावर दिव्यांची रोषणाई करून साजरे करण्यात येते.

झारखंड, बिहार : बिहारमध्ये दिवाळीतील षष्ठीचे महत्त्व असून षष्ठीला साजरी होणारी छटपूजा खूप धार्मिकपणे केली जाते.

सिंधी दिवाळी : सिंधी बांधवांच्या वसाहती भारतभर ठिकठिकाणी असून ते माता लक्ष्मीची पूजा करण्यापूर्वी चांदी किंवा सोन्याचे नाणे दुधाने धुऊन घेतात. लक्ष्मी मातेच्या पूजनानंतर ते नाणे दातावर वाजवून 'लक्ष्मी आयी, दानत लायी' असा जयघोष करतात आणि आनंद साजरा करतात.

भारताप्रमाणेच नेपाळ या हिंदू राष्ट्रात तसेच मॉरिशस, मलेशिया, इंडोनेशिया, म्यानमार, सिंगापूर, श्रीलंका, जपान, थायलंड, दक्षिण आफ्रिका, केनिया, टांझानिया, ऑस्ट्रेलिया, गयाना, सुरिनाम, फिजी या देशांमध्ये राष्ट्रीय सण म्हणून दिवाळी साजरी करण्यात येते. अलीकडच्या काळात इंग्लंड व अमेरिकेतही रोषणाई व फटाक्यांच्या आतषबाजीसह दिवाळीचा सण मोठ्या आनंदात साजरा होतो. अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणारा हा सण साऱ्यांनाच प्रिय आहे, एवढे नक्की.

(संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी.)

सुवर्णमंदिरावरील रोषणाई.

कर्नाटकमध्ये बळीराजाचे पूजन.

भरडधान्यांचे आरोग्यासाठीचे उपयोग

डॉ. प्रकाश कोंडेकर

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अथक प्रयत्नामुळे, जागतिक आरोग्य संघटनेने २०२३ हे भरडधान्य वर्ष (Millet Year) म्हणून जाहीर केले. भारताचा या मागचा उद्देश सर्वांचे आरोग्य हा तर आहेच; पण या धान्यांच्या पिकांच्या लागवडीमुळे शेतकरीदेखील त्यांचे उत्पन्न वाढवून नफा वाढवू शकतील, हादेखील आहे.

खरंतर भरडधान्यांचा आरोग्यासाठीचा उपयोग, शेकडो वर्षांपासून आयुर्वेदामध्ये सांगितला आहे व केला गेला आहे, परंतु मधल्या काही काळात काही कारणास्तव पुरेपूर प्रमाणात उपयोग केला गेला नाही. भरडधान्य वर्षाच्या निमित्ताने व सरकारच्या धोरणामुळे यापुढे जनसाधारण याचा उपयोग करून अथवा करवून घेतील ही अपेक्षा.

आरोग्याच्या व आयुर्वेदाच्या दृष्टीने, काही भरडधान्यांचा आपण विचार करू.

अलीकडच्या एका अंदाजाप्रमाणे, भारताचे भरडधान्याचे पीक ५ कोटी टन इतके असेल, जे आशियामध्ये ८० टक्के व जगामध्ये २० टक्के इतके अंदाजित आहे.

भरडधान्यात, ज्वारी, बाजरी, राजगिरा, कोद्रा, कुटकी, राळा, नाचणी व वरई ही धान्ये मुख्यतः पिकवली जातात. या पिकांमध्ये भरपूर पौष्टिक द्रव्ये असतात. ज्यामुळे आरोग्य अबाधित राहू शकते.

नाचणीचा उपयोग गेल्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणात केला गेला वा अजूनही केला जातो. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातील कॅल्शियमचे प्रमाण ज्यामुळे हाडे मजबूत राहतात.

शरीरातील पेशींचे आरोग्य राखण्यासाठी, बाजरीचा भाकरी व लापशी म्हणून उपयोग होतो. पेशींना ऊर्जेसाठी व वेगवेगळी खनिजे साठवण्यास मदत होते. रक्ताचा लालपणा अर्थात हिमोग्लोबिन वाढविण्यास यात असलेले लोह मदत करते.

पचनसंस्थेच्या कार्यक्षमतेसाठी काळे हे धान्य मदत करते. मज्जासंस्थेच्या आरोग्यासाठी कोद्रा हे धान्य खूपच उपयोगी आहे.

बाजरीची भाकरी

वजन कमी करायला मदत करते. भरपूर

कॅलरी असल्यामुळे, व्यक्तीची कार्यक्षमता वाढवते. साधारणपणे रोज दोन बाजरीच्या भाकरीच्या सेवनाने शरीरातील कोलस्टेरॉल कमी करते. हृदयाची कार्यक्षमता वाढवते.

बाजरीमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असल्यामुळे केसांची मुळे मजबूत होतात व केस गळायचे थांबतात, रक्ताभिसरण सुधारते. दम्याच्या काही रूग्णांमध्ये बाजरीच्या सेवनाचा खूप फायदा होतो. नियमित सेवनाने दमा बराही होऊ शकतो.

बाजरीचे अतिसेवन थायरॉईडच्या रूग्णांना धोकादायक होऊ शकते, ते त्यात असणाऱ्या काही विषद्रव्यामुळे (Toxins).

नाचणीचा उपयोग मधुमेहावर, वजन कमी करून रक्तातील साखर नियंत्रित करण्यासही होतो.

उपवास व राजगिरा हे समीकरण भारतामध्ये शेकडो वर्षांपासून चालत आले आहे. अंगारकी चतुर्थी, एकादशी, संकष्टी चतुर्थीला शरीराला भरपूर पोषण देणाऱ्या पदार्थांमध्ये राजगिरा लाडू, चिक्की व दुधातून राजगिरा हे पदार्थ बरेचदा असतात. यामध्ये असलेल्या जीवनसत्व बी–१, बी–२ बी–५, बी–६, सी, ई वगैरेमुळे शरीर निरोगी व ऊर्जायुक्त राहायला मदत होते. आयुर्वेदामध्ये राजगिरा, रूचिवर्धक, रक्तशोधक, स्तन्यवर्धक; तसेच मलसारक मानला जातो.

राजगिरा पचायला जड असतो, म्हणून वजन कमी करायला मदत करतो. नियमित सेवनाने, राजगिरा संधिवातामध्ये सुखकारक ठरतो. तंतुमय पदार्थ व पोटॅशियम असल्यामुळे हृदयाच्या मजबुतीसाठी व पचनक्रिया सुधारण्यासाठी राजगिरा उपयुक्त आहे.

इन्स्युलिन नियंत्रित करण्यासही राजगिरा योग्य ठरतो. मॅग्नेशियमचे प्रमाण कमी असल्यामुळे अर्धशीशीवरील औषध म्हणूनही याचा वापर केला जातो. तंतुमय पदार्थ व सॅच्युरेटेड फॅट्समुळे रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करायला मदत करतो ज्यामुळे हृदय सक्षम राहते.

भरडधान्य सवा (little millet) मध्ये अतिशय गुणकारी व भरपूर पॉलिफिनॉल व अँटी ऑक्सिडंट असतात. त्यांच्या सेवनाने शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढते. यामध्ये टॅनिन व फ्लेवनॉईडस् पण असतात, ज्यांचा उपयोग मधुमेह नियंत्रण, मोतीबिंदू, कर्करोग, पोटाचे विकार नियंत्रणासाठी व जीवनमान वाढविण्यासाठी होतो. यातील तंतूमय पदार्थ रक्तशर्करा आटोक्यात ठेवतात. तसेच यांतील मॅग्नेशियम कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतो व वजन नियंत्रणात ठेवतो. त्याचप्रमाणे यातील तंतुमय पदार्थ पाण्याच्या नियंत्रणामुळे शरीरातील विषद्रव्यांचा निचरा करतो. दमेकरी व्यक्तींनाही या सवा धान्याच्या सेवनाने फायदा होतो.

या व अशा प्रकारे वेगवेगळी भरडधान्ये म्हणजे मानवाला मिळालेली आरोग्याची कवचकुंडलेच आहेत.

B.Sc (Hons), LL.B, N.D, AVR, FRSH (London),
BTER (UK) IIPA Member.

वारकऱ्यांच्या हृदयात उमटलेला आनंदस्पर्श

स्नेहल सवदत्ती

महाराष्ट्राची ओळख म्हणजे संतांची परंपरा आणि या परंपरेचा प्राण आहे पंढरपूरची 'वारी'! लाखो वारकरी विठ्ठलनामाचा गजर करत मैलोन्‌मैल प्रवास करतात, थकवा विसरतात आणि भक्तीचा महासागर साकारतात. ही केवळ यात्रा नसून, महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सजीव उत्सव आहे; पण या महासागराला सुरक्षिततेचे, स्वच्छतेचे आणि सुसंघटित व्यवस्थापनाचे किनारे मिळवून देणे हे प्रशासनासमोरील सर्वात मोठे आव्हान असते.

सूक्ष्म नियोजनातून यंदा या जबाबदारीचे यशात खरे रूपांतर ग्रामविकास विभागाने केले आणि या यशस्वी कार्यामागे उभे राहिले होते ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे. ज्यांचे नेतृत्व, कार्यतत्परता आणि वारकऱ्यांविषयीची अपार संवेदनशीलता सर्वत्र जाणवली.

'वारी'च्या रूपाने महाराष्ट्राला लाभलेली महान संतपरंपरा अधोरेखित होते. अखंड वारकरी संप्रदाय आणि भक्तजनसागर या निमित्त पंढरपुरात अवतरतो. राज्य शासनाच्या महत्त्वपूर्ण योजनांची सविस्तर माहिती जमलेल्या जनसमुदायाला व्हावी यासाठी 'संवादवारी' सारखा सर्वसमावेशक उपक्रमातून शासनाची मूल्यवर्धित संकल्पनाही वाखाणण्याजोगी आहे.

नियोजनाचा नवा आदर्श

वारीपूर्वी विभागाचे मंत्री श्री. गोरे यांनी ग्रामपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत सलग नियोजन बैठकांचे आयोजन केले. प्रत्येक वारकरी हा आपला कुटुंबीय आहे, या भावनेतून त्यांनी आरोग्य, निवारा, सुरक्षितता आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवस्थापन अधिक प्रभावी बनवले गेले.

वारकऱ्यांसाठी स्वच्छ शौचालये, शुद्ध पिण्याचे पाणी, रस्त्यांची दुरुस्ती, २४ तास वैद्यकीय सुविधा, रुग्णवाहिका व्यवस्था, वाहतूक नियंत्रण या सर्व सेवांचा दर्जा अनुभवताना प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद झळकत होता.

जनतेत मिसळणारे नेतृत्व

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वशैलीतील खरी ताकद म्हणजे लोकांमध्ये मिसळणे. त्यांनी पंढरपूरच्या पायवाटांवर प्रत्यक्ष पाहणी करून वारकऱ्यांचे मनोगत जाणले आणि तातडीने प्रशासनाला दिशा दिली. विभागातील अधिकारी–कर्मचारीही या आत्मीयतेने प्रेरित होऊन उत्साहाने काम करताना दिसले.

मुख्यमंत्री महोदयांचे सहकार्य

या व्यवस्थापनाला बळ दिले ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने. आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि संसाधनांची तातडीने उपलब्धता त्यांनी करून दिली. त्यांच्या सहकार्यामुळे ग्रामविकास मंत्री आणि मुख्यमंत्र्यांचा समन्वय हा यंदाच्या वारी व्यवस्थापनाचा खरा आधारस्तंभ ठरला.

वारकऱ्यांचा दिलदार प्रतिसाद

हजारो वारकरी कृतज्ञतेने म्हणाले –

वारीत पहिल्यांदाच एवढ्या उत्तम सुविधा मिळाल्या!

हे केवळ प्रशंसेचे शब्द नाहीत, तर ग्रामविकास विभागाच्या कार्यसंस्कृतीला मिळालेला जनतेचा आशीर्वाद आहे.

मंत्री श्री. गोरे यांनी दाखवून दिले की, संवेदनशील प्रशासन, कुशल नियोजन आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यांच्या संगमातून कोणताही उपक्रम फक्त यशस्वीच नाही, तर आदर्श ठरतो. महाराष्ट्राचा ग्रामीण भागही चांगल्या नियोजनातून येणाऱ्या कोणत्याही आवाहनाला तोंड देण्यासाठी आज सक्षम आहे. याची प्रचिती यंदाच्या वारीतून पुन्हा नव्याने आली.

वारीनंतरचा सन्मान

वारकऱ्यांच्या या आनंदलहरीत विभागानेही आपले ऋण व्यक्त केले. या वर्षीच्या गणेशोत्सवासाठी खास वारीच्या सजावटीचा देखावा साकारून ग्रामविकास विभागाने आपल्या मंत्रिमहोदयांचा सन्मान केला.

(ग्रामविकास विभाग.)

राज्यातील सर्व शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे शासनाचे आवाहन

अश्विनी पुजारी

शाळा ही केवळ शिक्षणाची जागा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र असते. शाळेतून मिळालेल्या ज्ञान, संस्कार आणि मूल्यांवरच पुढील जीवनाचा पाया रचला जातो. या शाळांमधून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी प्रशासन, समाजकारण, राजकारण, संशोधन, उद्योग, शेती, व्यापार अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती करत आहेत. समाजाच्या उभारणीत योगदान देताना हे विद्यार्थी आपल्या शाळेबद्दल कृतज्ञतेने आठवण ठेवतात आणि विकासकामांत मोलाचा हातभार लावतात.

राज्यातील अशा सकारात्मक उदाहरणांचा विचार करून शासनाने सर्व जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका; तसेच खासगी (अनुदानित/विनाअनुदानित) शाळांमध्ये 'माजी विद्यार्थी संघ' स्थापन करण्याचे आणि माजी विद्यार्थी मेळावे आयोजित करण्याचे आवाहन केले आहे.

संघ स्थापनेची रचना व तत्त्वे

प्रत्येक शाळेचा 'माजी विद्यार्थी संघ' नावाने स्वतंत्र संघ तयार होईल. या संघात अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष हे माजी विद्यार्थी असतील, तर सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य कार्य करतील. स्थानिक तसेच बाहेरगावी स्थायिक माजी विद्यार्थी सदस्य म्हणून सहभागी होतील. सल्लागार म्हणून पालक प्रतिनिधी, निवृत्त अधिकारी, शिक्षक आणि उपक्रमशील शिक्षकांचा समावेश असेल. सर्व माजी विद्यार्थी ऑनलाइन किंवा ऑफलाइन नोंदणी करून सभासदत्व घेऊ शकतात.

संघाची प्रमुख कार्ये

शाळेच्या भौतिक सुविधा उभारणी, सौंदर्यीकरण, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, क्रीडांगण, प्रयोगशाळा, संगणक व ग्रंथालय सुविधा यासाठी सहयोग करणे. विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी, व्यक्तिमत्त्व विकास, डिजिटल साक्षरता, रोजगार कौशल्य अशा विविध उपक्रमांमध्ये सहभाग देणे.

शाळेबद्दल आत्मीयता जपण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन, माजी व सध्याच्या शिक्षकांचा सन्मान, शिष्यवृत्ती योजना, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन अशा कृतींनाही महत्त्व देण्यात आले आहे. आर्थिक पारदर्शकता राखत शाळेला थेट रोख रक्कम न देता आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

शासनाची भूमिका व अपेक्षा

या उपक्रमाद्वारे शिक्षणाचा दर्जा ग्रामीण व शहरी भागात समान रितीने वाढवणे, माजी विद्यार्थ्यांचे शाळेशी असलेले ऋणानुबंध घट्ट करणे आणि त्यांच्या यशकथांमधून सध्याच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हे उद्दिष्ट आहे. शासन या उपक्रमाला धोरणात्मक पाठबळ देईल व विभागीय अधिकाऱ्यांमार्फत सर्व शाळांमध्ये संघ स्थापन करण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण केली जाईल.

प्रत्येक शाळेने वर्षातून किमान एकदा माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करून विकास आराखडा ठरवावा, सन्मान कार्यक्रम घ्यावा आणि त्याची छायाचित्रे व माहिती शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करावी, असेही या परिपत्रकात नमूद आहे.

हा उपक्रम केवळ औपचारिकता नसून शाळा, विद्यार्थी आणि समाज या त्रिसूत्री नात्याला अधिक दृढ करणारे पाऊल आहे.

(संदर्भ : शासन परिपत्रक क्र :- संकिर्ण २०२५/प्र.क्र.३०५/एस.डी.४ दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५)

(सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.)

देवनागरी भाग–४

अजय भोसले

देवनागरीमध्ये स्वर, व्यंजन, जोडाक्षरे अशा विविध घटकांमुळे दृश्यात्मक सुसंगती राखणे एक आव्हान असते. देवनागरीमध्ये कलात्मक लेखनाचा प्राचीन संदर्भ मिळणे कठीण आहे. काही मोडी पत्रात थोडीशी नक्षी आढळते. मात्रा, शिरोरेखा, अनुस्वार, उकार याच्या मोजमापाचे काही संदर्भ अलीकडील कागदपत्रात सापडतात, परंतु देवनागरी सर्वंकष अभ्यासाचे रोमन लिपीप्रमाणे काही संदर्भ अभावानेच आढळतात . क, म, प, र, ठ अशी काही अक्षरे आली की, दृश्यात्मक सुसंगत परिणाम साधणे अवघड असते. बापुराव नाईक यांच्या एका जुन्या पुस्तकात याबद्दल विवेचन आहे. अक्षरांची रचना सुसंगतीच्या दृष्टीने बाजूच्या चित्रात समजून घेऊ.



वरीलप्रमाणे सराव केल्यास अक्षरचनेतील सुसंगती राखता येते, परंतु मराठीत सुलेखनाचा अर्थ फार मर्यादित आहे. मराठीत साधारणत: सुलेखन म्हणजे सुवाच्य लेखन. वरीलप्रमाणे रचनेचा सराव केल्यास नक्कीच सुलेखनास ही पद्धती उपयोगी होईल. तथापी, calligraphy चे विश्व व्यापक आहे, त्याबद्दल आपण पुढील भागात पाहू.

(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन).

डावीकडील चित्रात एकाच अक्षरातून निर्माण होणारी काही अक्षरे पाहता येतील, तर खालील चित्रात एक अक्षर वेगवेगळ्या पद्धतीने कसे लिहितात, हे पाहता येईल. तथापि सुवाच्य लेखनाकरिता टायपोग्राफीचा अभ्यास आवश्यक आहे. अक्षरे एकसमान सुसंगत दिसण्याकरिता वरील सराव महत्त्वाचा आहे.

सलाम लालपरी!

अश्विनी शिंदे-पवार

एस.टी.प्रवास तसा सर्वसामान्यांना परवडणारा आणि सोयीचा! त्यातल्या त्यात महिला सन्मान योजना सुरू झाल्यापासून महिलांच्या तर अधिकच सोयीचा! मात्र कधी कधी ही सोय करताना महामंडळाकडून गैरसोयीही होते! या 'लालपरी' सोबतच्या प्रवासाचा एक अनुभव शेअर करीत आहे.

गेल्याच आठवड्यात रविवारी कराडवरून मुंबईसाठी ऑनलाइन आरक्षण केले होते. आरक्षण केले होते शिवशाहीचे! मात्र प्रत्यक्षात बस आली ती 'साधारण'!

प्रत्यक्ष प्रवास सुरू होण्यापूर्वी बसचे वाहक (कंडक्टर) अभिजित सोळसकर यांचा फोनही आला. त्यांनी त्यांचे कर्तव्य म्हणून बस शिवशाहीऐवजी 'साधारण' असल्याची सर्वसाधारण कल्पना दिली. मात्र आता या 'कॉमन वुमन'चा प्रवास कसा असाधारण असेल, याची कल्पना मलाही आली. त्यात प्रवास 'दिवसा'चा असल्याने एसीशिवाय बसच्या कल्पनेनेच मला 'घाम फुटला!' प्रवासात तर प्रत्यक्षातही 'घाम फुटला' हे वेगळे सांगायला नकोच!

इतक्या सगळ्या प्रवासात झालेल्या गैरसोयीबद्दल मी संबंधित वाहकाकडे अर्थात तक्रार केलीच, तर त्यांनी मला लेखी रीतसर तक्रार नोंद करण्याविषयी सुचविले. शासन किंवा शासनपुरस्कृत कोणतेही महामंडळाकडून तक्रार निवारणबाबत सर्वसाधारण समाजमान्य 'गृहीतक' करून तक्रारीचे काय निवारण होईल, याची साधारणच अपेक्षा गृहीत धरली. तरीही मी लेखी तक्रार ई-मेलद्वारे केलीच! आणि काय आश्चर्य? महामंडळाचे मला लेखी उत्तरही मिळाले. सदर तक्रारीची तत्काळ पोहोच मला देण्यात आली. दुसऱ्या दिवशी फॉलोअपसाठी करंट स्टेट्स काय? असा मेसेज केला असता माझी तक्रार संबंधित अर्नाळा डेपोकडे सोपविण्यात आल्याचे सांगितले. सदर डेपोकडून लगेच फोन आला. झाल्या तसदीबद्दल महामंडळाने रीतसर दिलगिरी व्यक्त करून बस बदल करण्याचे अपरिहार्य कारण संबंधित शिवशाही बसचे ब्रेक डाऊन असल्याचे सांगण्यात आले. तिकीट दरातील फरकाची तिकीट रक्कम मला अदा करण्याची तयारी दर्शवली.

प्रवासात असा प्रसंग आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी आलेला असतो; पण आपण व्यक्त होणे टाळतो; पण आपल्यासारख्या एखाद्या सुजाण नागरिकाच्या व्यक्त होण्यामुळे, व्यक्त न होणाऱ्याचे म्हणणेही संबंधित संस्थेपर्यंत पोहोचावे हाच माझा हेतू! एकंदरीत शासन आणि शासनकृत एसटी महामंडळ सर्वसामान्य प्रवाशांची दखल घेते. खरोखरच यामुळे एसटी महामंडळ सेवेबाबत प्रवाशांचा विश्वास द्विगुणित होईल, म्हणून मुद्दाम हा अनुभव शेअर करत आहे. शासन अनुदानावर चालणारे हे महामंडळ दुर्गम भागातील प्रवाशांसाठी काम करत आहे. कित्येक खेडोपाडी जेथे खासगी वाहनाची उपलब्धता नाही, तेथे एसटी नित्य नियमाने उत्तम सेवा बजावत आहे. सलाम लालपरी!

(जीएसटी ऑफिसर, बांद्रा.)

अजय भोसले यांच्या घरातील गणपती.

शैलेश कदम, आर्टिस्ट, आपलं मंत्रालय यांच्या घरातील गौरीगणपती.

राजभवन, मुंबई.

ग्रामविकास विभाग.

रंगात रंगुनी मिळून साऱ्याजणी...

माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय.

लघुलेखक, मंत्रालय.

नियोजन विभाग, मंत्रालय.

पेपरवेट

तुमच्या मनातले मांडे मनातच राहते, कितीही आखा बेत,
बायको म्हणजे पेपरवेट,फडफडू देते; पण उडू नाही देत...

तशी दाखवते मोकळीक, नाचा म्हणते कोणाचीही असू द्या वरात;
पण दोन ठुमके का तिच्या बहिणीसोबत लावले, तर कर्फ्यू लागते घरात,
नसनस ओळखते तुमची, मेव्हुणीसोबत मग शब्द बोलू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट, फडफडू देते; पण उडू नाही देत...

सीसीटीव्हीसारखी निगराणी, आजूबाजूला नको असते मुली,
आलीच कधी शेजारीण घरी, तर तिच्या चेहऱ्यावर पडते फुली,
एक स्माईल आणि दोन शब्दांच्या पुढे तुम्हाला सरकू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट, फडफडू देते; पण उडू नाही देत...

तुमच्या मैत्रिणी, कामाच्या ठिकाणच्या सहकारी पाकिस्तानी वाटते,
तुम्ही घरात कधीच नसता बाजीराव; पण त्यांच्यात मस्तानी दिसते,
तुमचंच कसं हो साऱ्या बायकांशी जमते, या चर्चेवर रात्र सरू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट, फडफडू देते; पण उडू नाही देत...

आते-मामे बहीण, मानली बहीण दिसली की, ॲन्टिना असते उभा,
नातेवाईकांची गर्दी कितीही असुद्या, एकट्याला बोलायची नसते मुभा,
अशी बसते खेटून, अख्खं लग्न लागेपर्यंत जागची उठू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट,फडफडू देते; पण उडू नाही देत...

जगातले सारे पासवर्ड शोधून काढायची बायकोमध्ये असते ताकत,
कोणत्याही टेक्नॉलॉजीचा येऊ द्या मोबाइल, बायको नाही वाकत,
'चिंटू प्लंबर' म्हणजे तुमचा डाव, माहिती असते; पण ती कळू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट, फडफडू देते पण उडू नाही देत...

किती प्यायले, कोणासोबत बसले, फक्त चालीवरून ठरवते,
नाईंटी की रिचवला पूर्ण खंबा? कोडं फक्त उच्चारावरून सोडवते,
चमन चटणी खा की इलायची, सत्कार तुमचा हुकू नाही देत,
बायको म्हणजे पेपरवेट, फडफडू देते; पण उडू नाही देत...

तुम्हाला वाटते तुम्ही डॉन, तिला जिंदगीचा माहिती असते सिलसिला
दलदल कुठे आणि कुठे फसते तुमचा पाय माहिती असते वाघिणीला
जाणून असते तुमचा कुटाणा पण ती चेहऱ्यावर येऊ नाही देत
बायको म्हणजे पेपरवेट,फडफडू देते पण उडू नाही देत...

– प्रवीण टाके
(उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.)

'ती' आणि 'तिची फोटोतली आई'

समजाउमजायला लागले,
तेव्हा लेकच आई आणि आई लेक झाली..
लहानपणी, तरुण वयात सर्वांत जास्त जवळची
'तिची' आई होती; पण नंतरच्या काळात मात्र
'ती' या फोटोतल्या आईला पाहून मोठी झाली...
कधी इतर मैत्रिर्णींचे त्यांच्या आईसोबतचे किस्से,
गप्पा ऐकून 'ती' सुद्धा मग
'फोटोतल्या आईशी' बोलू लागली...
कधी 'तिला' वाटे आईच्या मिठीत घट्ट शिरून रडावे,
बोलावे, भांडावे, हसावे,
तेव्हा 'ती' मात्र 'फोटोतल्या आईला'
घट्ट छातीशी धरून बोलू लागली,
सणा समारंभात, लग्न कार्यक्रमात
जेव्हा इतर माय आपल्या लेकींचं कौतुक करीत,
डोहाळे पुरवीत, लाड करीत, तेव्हा मात्र 'ती' केविलवाणी
मनातच 'फोटोतल्या आईचा' चेहरा आठवत राही...

– वर्षा फडके-आंधळे
उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

तू आहेस अशीच...

तू राहशील अशीच स्वतःत हरवत
मी राहीन तुझी वाट निरखत
कधी होशील तू बेबंद वारा
घुसळून टाकशील आसमंत सारा
तू उसळत नाचणाऱ्या अवखळ लाटा
का ओल्या वाळूत रेखलेल्या स्वप्नील वाटा
तू मुक्त उडणारा अवखळ रावा
की उंच उडणाऱ्या पाखरांचा थवा
तू आहेस सळसळणारी पाऊलवाट
रानभूल देऊन फिरणारी सुसाट
मनात गुंफलेली तू सुरेल तान
शब्दात रमलेल गोड स्वप्नील गान
कधी खोल मनाचा तू गूढ गाभारा
फुलात सजलेला सात्विक देव्हारा
तू आहेस अशीच... तू आहे अशीच...

– संजीव केळुसकर



मराठी अनुवाद

अश्रू...

डोळे अश्रू रोखू शकले नाहीत,
आणि हृदय तुला?
रिकाम्या झालेल्या हृदयात
कुणाचे तरी अवशेष राहतात.
ज्याला माहीत आहे, तो विश्वास ठेवणार नाही,
मग हृदय तुला माफ करेल का?

– अंकुर श्रीमाळी
(सहायक संचालक, माहिती संचालनालय, गुजरात राज्य.)



लक्ष्मीविलास पॅलेस बडोदा

भाग्यश्री भाईडकर

कधीकधी आपण दूरदूरची भ्रमंती करतो आणि जवळचे प्रदेश नंतर पाहू म्हणून राहून जातात. गुजरात त्यापैकीच एक. अगदी शेजारी असलेले हे राज्य खरेतर तुकड्या तुकड्यांमध्ये; पण आपण पाहू शकतो. मागील वर्षी मार्चच्या सुरुवातीस एक दिवस अचानक मनात आले आणि आम्ही बडोद्याला धावती भेट द्यायचा निर्णय घेतला. आम्ही म्हणजे मी व माझी मुलगी दोघी. बडोदा हे गुजरातमधील प्रमुख शहर आहे. गुजराती भाषेत याला वडोदरा असे संबोधले जाते. हे शहर विश्वामित्री नदीच्या काठावर वसलेले आहे. १६ व १७ व्या शतकात या शहरावर मुघल साम्राज्याचे आधिपत्य होते. इ.स. १७२१ साली येथून मराठ्यांनी मुघलांना हुसकावून लावले आणि पिलाजीराव गायकवाड बडोदा संस्थानचे पहिले मराठा संस्थानिक झाले. ब्रिटिश राजवटीतदेखील या संस्थानाचा दर्जा स्वायत्त होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर बडोदा संस्थान इ.स. १९४९ मध्ये भारतात विलीन झाले. मुंबईपासून बडोदा अंदाजे ४१२ कि.मी. इतक्या अंतरावर, तर गुजरातची राजधानी अहमदाबादपासून अंदाजे ११४ कि.मी. इतक्या अंतरावर आहे. बडोद्याचे क्षेत्रफळ ४२० चौ.कि.मी. इतके असून २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या २०.६५ लक्ष इतकी आहे. शहरात राहण्यासाठी उत्तम खासगी हॉटेल्स आहेत. सध्या बडोदा गुजरातमधील मोठे उद्योगांचे केंद्र मानले जाते. मुंबई ते दिल्ली दरम्यान असलेला राष्ट्रीय महामार्ग ८ बडोद्यामधून जातो. बडोदा शहर रेल्वेने व विमानाने भारतातील सर्व प्रमुख शहरांना जोडलेले आहे. शहराला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा आहे. शहरात प्रामुख्याने उर्दू, मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराती भाषा बोलल्या जातात. येथे भेट देण्यासाठी ऑक्टोबर ते मार्च हा कालावधी अत्यंत उत्तम आहे. लक्ष्मीविलास पॅलेस, कीर्ती मंदिर, महाराजा फतेहसिंग म्युझियम व सुरसागर लेक ही येथील प्रमुख आकर्षणे आहेत. इतर आकर्षणांमध्ये तांबेकर वाडा, सयाजी बाग म्युझियम यांचा समावेश आहे. सामान्यत: एक ते दोन दिवसांमध्ये बडोदा शहरातील प्रमुख आकर्षणे पाहणे शक्य आहे.

मुंबई बडोदा हा प्रवास रेल्वेमार्गाने सर्वात सोयीचा असल्याने आम्ही रेल्वेने बडोदा गाठायचा निर्णय घेतला. वंदे भारतचे आरक्षण वेटींग एक व दोन दाखवत होते. त्यामुळे बडोद्यास जाण्यासाठी शनिवारी सकाळी वंदे भारत व येण्यासाठी रविवारची सकाळी आठ वाजताची तेजस. म्हणजे वेगळी सुट्टी न घेताही आमचा हा कार्यक्रम पार पडणार होता. मेकमायट्रीपवरून हॉटेलचे आरक्षण केले होते. बडोद्यामध्ये आमच्या प्राधान्यावर होते बडोद्याचे आकर्षण लक्ष्मीविलास पॅलेस व महाराजा फतेहसिंह म्युझियम.

ठरल्याप्रमाणे आम्ही शनिवार ९ मार्च २०२४ रोजी सकाळी साडेसहाच्या वंदे भारतने प्रयाण केले. बडोद्यात उतरेपर्यंत सकाळचे सव्वा दहा वाजले होते. मूळच्या मुंबईकर आम्ही बडोद्यात उतरल्यावर मात्र सुरुवातीला थोड्या गडबडलो. रेल्वेच्या पुलावर गर्दी दिसत नव्हती. कोणाला विचारावे तर पुलावर चिटपाखरू नव्हते. अंदाजानेच डाव्या हाताला वळलो. पुलाखाली रिक्षा व टॅक्सी स्टँड होता. समोर बडोदा रेल्वे स्टेशनची प्राचीन इमारत. खाली उतरताच रिक्षावाल्यांनी कोठे जायचे म्हणून गराडा घातला. मार्चची सुरुवात असली तरीही बडोद्यात सकाळी १० वाजता जाणवण्याइतपत ऊन होते. दोनच महिला तेही मुंबईहून जास्त सामान न घेता आल्याचे पाहिल्यावर हॉटेल मॅनेजरने आधी आ वासला व नंतर सुरुवातीच्या धक्क्यातून सावरल्यावर त्यांनी आम्हाला बडोद्यात सार्वजनिक वाहतुकीतून कसे फिरावे याची जुजबी माहिती दिली. जवळच रिक्षा स्टँड असून तेथून आम्हाला लक्ष्मीविलास पॅलेसला जायला रिक्षा मिळू शकतील, याचा त्यांच्या बोलण्यातून अंदाज आला. पोटपूजा तशीही आधी झाली होतीच. त्यामुळे आम्ही लगेचच रिक्षाने लक्ष्मीविलास पॅलेस गाठला. सकाळी ९.३० ते ५.०० या वेळेत राजवाडा पर्यटकांना पाहण्यासाठी खुला असतो. पर्यटकांसाठी प्रवेशद्वाराजवळ तिकीट काऊंटर असून ऑनलाईन तिकीट काढण्याचीसुद्धा व्यवस्था आहे. राजवाडा व त्याचाच एक भाग असलेले फतेहसिंह म्युझियम पाहायचे एकत्रित

तिकीट पण आपण घेऊ शकतो, परंतु हा राजवाडा समजून घ्यायचा असेल, तर ऑडिओ कॉमेंटरी आवश्यक आहे. त्यासाठी अत्यल्प शुल्कात आपल्याला ऑडिओ रेकॉर्डिंग प्रवेश केल्यावर उपलब्ध करून दिले जाते. विशेष म्हणजे मराठीमध्येही हे रेकॉर्डिंग उपलब्ध आहे. आपल्या ऐकण्याच्या क्षमतेनुसार त्याचा वेग आपण कमी जास्त करू शकतो. राजवाड्याच्या एका भागात रॉयल फॅमिली राहते, तर दुसरा भाग सर्वसामान्य जनतेसाठी खुला आहे. राजवाड्याच्या अंतर्भागात फोटोग्राफीस परवानगी नाही. प्रवेशद्वारातून आत शिरल्याबरोबर हा राजवाडा आपल्या मनावर गारुड करतो. मराठ्यांचे संपन्न व वैभवशाली असलेले हे संस्थान व उंचच उंच कोरीव कमानी असलेला राजवाडा पाहताना आपण देहभान हरपून जातो. जणू काही परिकथेतल्या राजमहालात आपण आहोत असे वाटते. राजवाडा बाहेरून जेवढा सुंदर आहे, तेवढाच त्याचा अंतर्भागही सुंदर व विविध कलाकृतींनी सजलेला आहे.

बडोदा संस्थानचे महाराज तिसरे सयाजीराव गायकवाड हे इ.स.१८७५ ते इ.स. १९३९ या कालावधीत बडोदा संस्थानचे अधिपती होते. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याकरिता ते विशेषत्वाने ओळखले जातात. त्यांच्या हयातीत त्यांनी इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशांना भेटी दिल्या. परदेशातील शिक्षणपद्धती, सामाजिक सुधारणा व ग्रंथालये यांच्या धरतीवर त्यांनी बडोद्यात अनेक सुधारणा केल्या. त्यांच्या कालखंडात बडोद्यामध्ये सुंदर प्रेक्षणीय वास्तूंचे निर्माण करण्यात आले. त्यापैकीच एक लक्ष्मीविलास पॅलेस. महाराणी लक्ष्मीबाईंच्या नावावरून या राजवाड्याचे नाव लक्ष्मीविलास पॅलेस असे ठेवण्यात आले. व्हेनेशियन गॉथिक व इंडो सारासेनिक शैलीत या आलिशान राजवाड्याचे बांधकाम महाराज तिसरे सयाजीराव गायकवाड यांनी १८९० साली सहा दशलक्ष रुपये खर्चून केले. इंडो सारसेनिक म्हणजे हिंदू व इस्लामिक वास्तुशैलीचा मिलाफ. ७०० एकरपेक्षा जास्त जागेवर बांधण्यात आलेले हे आजपर्यंतचे सर्वात मोठे खासगी घर आहे आणि बकिंगहॅम पॅलेसच्या आकारापेक्षा चारपट मोठे आहे. विस्तीर्ण उद्यानाच्या मध्यभागी बांधलेल्या या राजवाड्यात बडोद्याच्या महाराजांचे निवासस्थान व राजदरबार होता. सयाजीरावांनी मेजर मॉट या ब्रिटिश इंजिनीयरकडून या वास्तूचा आराखडा तयार करून घेतला. मात्र, हा राजवाडा कधीही कोसळू शकेल, या भीतीने मेजर मॉट यांनी आत्महत्या केली. तरीही, त्यांनी बनवलेल्या आराखड्यानुसार पुढील बांधकाम करण्यात आले. आजही १३० पेक्षा अधिक वर्षे होऊनही हा राजवाडा सुस्थितीत आहे. उद्यानात गोल्फ कोर्स व क्रिकेट मैदान आहे. आवारात नवलखी पायऱ्यांची विहीर आहे. या राजवाड्याच्या बांधकामासाठी नवसारीजवळच्या सोनगडच्या खाणीतून तांबूस रंगाचा दगड आणला होता. इटालियन मोझॅक फरशांवर सोन्याच्या वर्खाने केलेली कारागिरी प्रवेशद्वारावरील भिंतींवर आहे. राजवाड्यात १७० खोल्या, अनेक हॉल्स व गॅलरी आहेत. दरबार हॉल हे या राजवाड्याचे प्रमुख आकर्षण आहे. खास व्हेनिसहून आणलेल्या फरशा दरबार हॉलमध्ये बसविण्यासाठी व्हेनिसचे बारा कारागीर १८ महिने काम करत होते. या दरबार हॉलच्या प्रत्येक कोपऱ्यात इटालियन शिल्पकार फेलिची याने बनविलेले संगमरवरी पुतळे असून राजघराण्यातील स्त्रियांना बसण्यासाठी हॉलच्या पहिल्या मजल्यावर गॅलऱ्या आहेत. खिडक्यांवर इटालियन स्टेन ग्लासमधील चित्रे आहेत. ग्रीक, रोमन, भारतीय तसेच,जपानी शोभेच्या वस्तू प्रत्येक ठिकाणी मांडलेल्या आहेत. गायकवाड राजपरिवारातील व्यक्तींची चित्रे व पुतळे जागोजागी ठेवण्यात आले आहेत. राजवाड्यातील संपूर्ण फर्निचर फ्रान्समध्ये तयार केलेले असून लक्ष्मीविलास पॅलेसच्या दक्षिणेकडील भागात महाराजांचे निवासस्थान आहे. लक्ष्मीविलास पॅलेसच्या परिसरात असलेल्या मोतीबाग पॅलेस आणि फतेहसिंग म्युझियममध्ये शस्त्रागार व महान चित्रकार राजा रविवर्मा यांनी चितारलेली तैलचित्रे आहेत. राजवाड्याभोवतीच्या परिसरात असलेली उद्याने, हिरवळीची कुरणे आणि कारंजी ही विल्यम गोल्डरिंग या ब्रिटीश उद्यानतज्ज्ञाने तयार केली आहेत.

राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश केल्यावर बगिचाच्या हिरवळीच्या दिशेने उघडणारे एक द्वार आहे. या द्वाराबाहेर येऊन उभे राहिल्यास समोर एक अवर्णनीय दृश्य दिसते. विस्तीर्ण हिरवळीवर एक मोठा चषक व त्यावर बसलेले दोन मोर. त्याच्या मागील बाजूस उभे राहिल्यावर दिसणारा पार्श्वभूमीतील राजवाडा म्हणजे एक अवर्णनीय सुंदर वास्तू. राजवाड्याच्या



शस्त्रागारात असलेला संग्रह पाहताना पानिपतच्या लढाईचा इतिहास आठवतो. अनेक शस्त्रे आणि त्यांचा युद्धात केला गेलेला वापर. विविध प्रकारचे भाले, जगातील विविध भागातील तलवारी, ढाली, विविध तोफा व तोफगोळे, अग्निशस्त्रे, बंदुका, बिचवे, बरच्या, कटार. मराठ्यांचा अतुलनीय पराक्रम काय होता याची एक झलक या शस्त्रागारातून दिसते. राज परिवार वापरत असलेल्या शस्त्रांची लांबी, त्यांची धार, त्यांचे तेज व त्यावरील कोरीव काम, शस्त्रे वापरताना त्यावर करण्यात येणारा विषाचा वापर आणि त्या शस्त्रांची नावे नागीण, नवदुर्गा अशी. नागीण तलवारीच्या टोकाला विष लावून तिचा वापर केला जाई. नवदुर्गा तलवारीवर दुर्गेचे नऊ अवतार कोरलेले आहेत. तलवारींवर अप्रतिम कारागिरी, सोन्याच्या मुठी आणि जडवलेले हिरे आहेत. पिसाळलेल्या हत्तीला काबूत आणण्यासाठी त्याच्या पायात घालायची काटेरी जंजीर. जणू काही तो काळ आपल्या दृष्टीसमोर उभा राहतो. गायकवाड घराणे सूर्यवंशीय असल्याने सूर्यपूजेची झलक राजवाड्याच्या भिंतीवरील कोरीव कामात दिसून येते. सूर्य व गायीच्या प्रतिमा राजवाड्यातील खांबांवर कोरण्यात आलेल्या आहेत. राज परिवारातील सदस्याला राज्याभिषेक करण्यात येणारी गादी आजही राजवाड्यात ठेवण्यात आलेली आहे. राजा रविवर्माच्या मूळ चित्रांनी सर्व दालने सजलेली आहेत. यापैकी लक्ष्मी, सरस्वती, राम सीता स्वयंवर, कीचक सैरंध्री, कारागृहातून कृष्ण मुक्तता इ. उल्लेखनीय चित्रे आहेत. राज परिवारातील मुलींसाठी खेळण्यासाठी एक भले मोठे लाकडी बाहुलीघर आहे. त्या दालनाच्या बाहेरील बाजूला पर्यटकांसाठी एक छोटासा कॅफे आहे. राजवाड्याच्या आवारात जुन्या शाही गाड्या ठेवलेल्या आहेत. राजवाड्याच्या अंतर्भागात पुरातन काळी बसविण्यात आलेले एक उद्वाहनसुद्धा आहे.

राजवाड्याच्या नजीकच्या परिसरात राजवाड्याचाच एक भाग असलेले महाराजा फतेहसिंग म्युझियम आहे. येथे जाण्यासाठी राजवाड्याच्या बाहेर पडून बाहेरील रस्त्याने वळसा घालून म्युझियमच्या प्रवेशद्वारात येता येते. तसे हे अंतर पायी जाण्यातले नाही. आम्ही रिक्षाने येथे पोहोचलो. पूर्वी या इमारतीत राजपरिवारातल्या मुलांची शाळा भरत असे. मुलांना रेल्वेच्या छोट्या इंजिनवर बसवून शाळेत नेण्या आणण्यात येत असे. हे इंजिन महाराजा फतेहसिंग म्युझियमच्या दारात आजही ठेवण्यात आलेले आहे. म्युझियममध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपले मोबाइल काऊंटरवर जमा करावे लागतात. आतमध्ये फोटोग्राफी करण्यास बंदी आहे. म्युझियममध्ये मराठा साम्राज्याच्या कला व इतिहास यांचा अमूल्य ठेवा आहे. युरोपीयन शैलीतील तैलचित्रे, संगमरवरी पुतळे, राजा रविवर्मा यांनी काढलेली चित्रे इ. चा संग्रह आहे. राजवाडा आणि महाराजा फतेहसिंग म्युझियम ही दोन्ही ठिकाणे पाहण्यासाठी किमान पाच ते सहा तासांचा वेळ हाताशी हवा. फोटोग्राफीची परवानगी या दोन्ही ठिकाणी अंतर्भागात नसल्याने तेथील फोटो काढता आले नाहीत; पण डोळ्यांसाठी ही एक अवर्णनीय पर्वणी होती. ही दोन्ही ठिकाणे पाहून झाल्यावर आम्ही हॉटेलवर परतलो आणि दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या रेल्वेने मुंबईत आलो. आणि अशा तऱ्हेने अगदी छोट्या कालावधीची आमची सहल सफळ संपूर्ण झाली.

(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)

एम.पी.एस.सी. २०१६ च्या राज्यसेवा परीक्षेत यश मिळवल्यावर 'कक्ष अधिकारी' या पदावर डॉ. स्नेहा चुरी यांची नियुक्ती झाली. या यशाच्या पार्श्वभूमीवरील त्यांचे हे मनोगत, परीक्षेचा अभ्यास आणि परीक्षेची राजनीती, दोन्ही उलगडून दाखवणारे...

यशाची रेसिपी

महिला म्हणून प्रशासकीय क्षेत्रात प्रवेश करताना त्याचे माझ्या आयुष्यात काय महत्त्व आहे, हे मला पक्के ठाऊक होतेच; पण या क्षेत्राचे महिलेसाठी असणारे महत्त्व आणि महिलांचे या क्षेत्रासाठी असणारे महत्त्वही मी जाणून होते.

महात्मा फुले यांच्या प्रयत्नातून स्त्री शिक्षण क्षेत्रात उतरली. डॉ. आनंदीबाई जोशींच्या योगदानातून ती आरोग्य व्यवस्थेत उतरली. म्हणूनच आज अनेक 'आशा' गावोगावी कार्यरत आहेत. पुढे, १९९३ मध्ये पंचायत राज व्यवस्थेतून ती राजकीय पटलावर सिद्ध झाली. महिला बचत गटातून ती अर्थव्यवस्थेत सक्षम बनतेय. तेव्हा आता वेळ आहे तिला या एमपीएससी आणि यूपीएससी आयोगाच्या पायवाटेवरून प्रशासकीय क्षेत्रात स्थानापन्न होण्याची! ही वेळ किंवा संधी प्रत्येक मुलीने तिला महिला 'प्रशासकीय अधिकारी' हे बिरुद लावण्यासाठी, समाजाच्या नि स्वतःच्या अर्थपूर्ण जीवनासाठी आणि सर्वार्थाने सक्षम होण्यासाठी साधायलाच हवी, ही काळाची गरज आहे.

डॉ. स्नेहा चुरी

मी स्वतः ५ वर्षं डेंटिस्ट म्हणून मुंबईत प्रॅक्टिस करत असताना एका विशिष्ट विचाराने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. माझी प्रॅक्टिस कधी पूर्णवेळ, तर कधी अर्धवेळ सुरू होती. शालेय वयापासून मी निबंध आणि कवितालेखनात प्रावीण्य मिळवले आहे. तेव्हा अभ्यासाबरोबर संबंधित क्षेत्रातील कार्यक्रम आणि स्पर्धातसुद्धा माझा सक्रिय सहभाग होता. हे सांगते आहे एवढ्यासाठी की, पुढील मार्गदर्शनपर माहितीत मी माझा वैयक्तिक प्रवास, उदा. माझे वय, परीक्षेचा प्रयत्न कितवा, घरची पार्श्वभूमी इत्यादी मांडणार नाही. कारण, मग ते विशेषीकरण होईल आणि जनरल वाटणार नाही किंवा ते गांधीजींच्या 'त्या' शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणार नाही. ते पोहोचावे आणि माझे मार्गदर्शन सर्वसमावेशक ठरावे, म्हणून हा लेखनप्रपंच ! प्राथमिक किंवा मुख्य परीक्षेसाठी सर्व विषयांतील सर्व संकल्पना जाणून घ्याव्यात. त्यासाठी संदर्भ पुस्तकांची उत्तम यादी mpscsimplified.com या संकेतस्थळावर दिली आहे.

एकदा संकल्पनांवर पकड घेतली की, दैनंदिन वृत्तपत्र वाचताना, 'त्या' संकल्पना त्याच्याबरोबर जोडाव्यात आणि आपले स्वतःचे मत बनवावे. अशा पद्धतीने अभ्यास केल्यास ते आपोआप वर्षभरात घडत जाते. याचा उपयोग निबंध लेखनात आणि नंतर मुलाखतीत नकळत होतो.

५०० पानांचे पुस्तक प्रथम वाचनात अर्धे, २५० पानांचे करावे. द्वितीय वाचनात ५० पानांचे करावे आणि तृतीय वाचनात, आपण ज्या नोट्स परीक्षेच्या आदल्या दिवशी वाचणार आहोत त्या, पाच पानांच्या असाव्यात.

प्राथमिक मुख्य परीक्षेचे पेपर सोडवताना त्या क्षणाला तोच प्रश्न सोडवावा. याचा अर्थ, आपण समजा २८ वा प्रश्न सोडवतोय तर चित्त तेथेच ठेवावे. आधीचे २७ प्रश्न चांगले गेले की वाईट, याचा विचार करू नये. नि त्यातून, म्हणजे २७ प्रश्न पाहूनच मला हा पेपर चांगला जाणार किंवा आता ही परीक्षाच हातून गेली अशी कुठलीही कुंडली मनात मांडू नये. फक्त प्रश्न वाचावा, त्याचे आकलन करून अचूक वर्तुळ काळवंडून किंवा पांढरेच ठेवून पुढे जावे... आणि सदैव पुढेच जावे. हे सांगण्याचे प्रयोजन, अभ्यास सगळेच करतात. ध्येय, त्यासाठीची धडपड सारेच करतात. पण परीक्षेच्या त्या रणसंग्रामात राजनीती लागते ती स्वतःशी लढण्याची, नकारात्मक विचारांवर मात करण्याची...!! माझ्या मते एवढे केले, तरी या स्पर्धा परीक्षेत उतरणाऱ्या, हुशार, उमद्या, मेहनती मुलांना त्यांच्या १०० टक्के इनपुटचे १०० टक्के आऊटपुट नक्की मिळेल.

वर उल्लेख केलेल्या संकेतस्थळावरील संदर्भ पुस्तके कोळून प्यावीत. सराव प्रश्नपत्रिका वेळ लावून सोडवाव्यात. प्रत्येक चुकीचे विश्लेषण करावे. त्या स्वतंत्र विषयानुरूप लिहून ठेवाव्यात, कारण आपल्या चुकांतूनच आपण खूप काही शिकतो.

भरपूर सराव (अभिरूप) मुलाखती द्यावेत. मुंबईतील मुलांनी त्यासाठी १५ दिवस तरी पुण्यात जावे. कारण येथील मुलांना सरकारी शिष्टाचार अंगी बाणवणे आव्हानात्मक आहे. म्हणजे एमपीएससी मुलाखतीस बसणे, बोलणे या सर्व गोष्टी मुंबईतील प्रचलित आचार – वर्तनापासून फार भिन्न आहेत. पुण्यात जाऊन सराव मुलाखती देऊन त्या प्रयत्नपूर्वक आत्मसात कराव्या लागतात. अनेकदा विषयांची तयारी करताना वाचन, नोटस् काढणे याबरोबर स्वतः आरशासमोर उभे राहून प्रश्नांची उत्तरे मोठ्याने म्हणणे, त्याचे रेकॉर्डिंग करणे इत्यादीचा वापरही प्रभावशाली ठरू शकतो. निश्चित ध्येय, प्रामाणिक प्रयत्न, थोडा मुंबईकर प्रलोभनाचा त्याग, यथोचित मार्गदर्शन असेल तर या परीक्षेत यश आपलेच आहे.

– डॉ. स्नेहा चुरी

अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

एखादा प्रसंग असा घडतो की, आपण संकटाच्या दरीत कोसळतो; पण अशा वेळी आपले जीवाभावाचे सहकारी येतात आणि आपली सुखरूप सुटका करतात.

सहकारी आले धावून

शिल्पा निनाद नातू

नेहमीप्रमाणे सकाळी कार्यालयात हजर झाले, कामाला सुरुवात झाली; पण मला जरा बरं वाटत नव्हतं. साडे दहाच्या सुमारास मला हुडहुडीच भरली. त्या वेळी हिवतापाची साथ असल्याने मला थोडीशी धास्ती वाटली. खरंतर सर्दी खोकल्याला कधीही औषध न घेणारी मी; पण कशी कोण जाणे, हुडहुडीला घाबरून दवाखान्यात जाऊन आले. डॉक्टरांनी ४ गोळ्यांचा कोर्स दिला होता. जागेवर येऊन लगेच गोळ्या घेऊन मोकळी झाले. तापामुळे मी जरा मलूलच होते; पण २ तासांनी माझ्या त्रासात आणखी भर पडली. मला फार अस्वस्थ वाटू लागलं. ठरल्याप्रमाणे मी आधीच्या ठिकाणी जेवायला गेले, या मला जेवायची इच्छा होत नव्हती, पाणी प्यायलं तरी ते गिळता येत नव्हते, बसणंही

अशक्य होऊ लागलं, नाईलाजास्तव मी जमिनीवरच आडवी झाले. माझी जीभ काम करेनाशी झाली, बोलती बंद झाली. नेमके काय करावं तेच कोणाला सूचत नव्हतं. डॉक्टर जेवायला गेल्या होत्या. कार्यालयात 'डॉक्टरकी' शिक्षण घेतलेले एक अधिकारी अन्यत्र कार्यरत होते. ते येऊन तपासून गेले. जे. जे. रुग्णालयात घेऊन जावे, अशी चर्चा सुरू होती. बोलू शकत नव्हते. त्यामुळे माझा त्रास सांगताही येत नव्हता, मला मैत्रिणींनी उठवून खुर्चीत बसवलं; पण पायात चपला अडकवण्याची शक्ती नव्हती. समोर आलेल्या व्यक्तीचं नाव काय, ते राहतात कुठे, हेच मला आठवत नव्हतं, हळूहळू माझ्या स्मृतीला धक्का बसतोय, याची मला जाणीव झाली.

'मला लवकरात लवकर रुग्णालयात घेऊन जा' असं ओरडून सांगावंसं वाटत होतं. ते ओरडणं प्रशांत कापरे या माझ्या सहकाऱ्याला जाणवलं, त्याने निर्वाणीच्या भाषेत 'हिला ताबडतोब उचला', म्हणत सचिवांच्या गाडीची व्यवस्था केली. मला खुर्चीत बसवून, खुर्ची लिफ्टपर्यंत ओढत कसंबसं गाडीत बसवलं. विभागातल्या तमाम सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर काळजी, चिंता दिसत होती. गाडीत बसल्यावर माझा त्रास आणखीन वाढला. अर्धवट ग्लानी, अर्धवट झोप अशा अवस्थेत माझा प्रवास झाला आणि जे.जे रुग्णालयाच्या दारात मला उतरवलं गेलं. कापरेंनी धावत जाऊन खुर्चीची व्यवस्था केली. मला खुर्चीत बसवून खुर्ची अक्षरशः ओढून घेऊन जाऊ लागले. गाडीतून जाताना कदाचित पोटातले सगळे ढवळून निघाल्यामुळे खुर्चीत बसल्यावर लगेच मला फसकन दोन उलट्या झाल्या. उलटी झाल्यावर मला थोडंसं बरं वाटलं. चक्र वेगाने फिरली, मला रुग्णालयात दाखल केलं. पटापट इसीजी, सगळ्या चाचण्या करून इंजेक्शन्स टोचण्यात आली. मधूनमधून माझ्या उलट्या सुरूच होत्या. रोहिणी, कल्पना, वैशाली, विद्या सगळ्या मला वारा घाल, पाणी दे, अशी सेवा करत होत्या. मला फार अपराध्यासारखं वाटत होतं. गुप्ते, परब, जोशी, कापरे हे सहकारी अधूनमधून स्थितीचा आढावा घेत होते. तीन-चार तासांनी माझ्या आरोग्यात बरीच सुधारणा झाली. दरम्यान नवऱ्याला फोन करून बोलावण्यात आलं. जेव्हा माझे बाबा आणि नवरा समोर येऊन उभे राहिले, तेव्हा कुठे मला स्ट्राइक झालं की, आपलं लग्न झालंय, आपल्याला दोन मुलं आहेत. तासाभराने डॉक्टरांनी सुटी दिली. गाडीतून घरी जाताना उलट्यांचं सत्र सुरूच होतं, पण प्रत्येक उलटी झाल्यावर मला बरं वाटत होतं. घरी पोहोचल्याबरोबर माझी दोन पिल्लं मला येऊन बिलगली, तेव्हा मला जे काही वाटलं, ते शब्दात सांगता येणार नाही. फॅमिली डॉक्टर घरी येऊन मला तपासून गेले. नियमित उपचार सुरू झाले. दरम्यान माझ्या प्रकृतीत बरीच सुधारणा झाली.

आठवडाभराच्या विश्रांतीनंतर कार्यालयात हजर झाले. दवाखान्यात जाऊन डॉक्टरांना भेटायला गेले. तेव्हा धक्कादायक स्थिती कळली की, हिवतापासाठी २५० मिलिग्रॅमच्या ४ गोळ्या याप्रमाणे १००० मिलिग्रॅमचा गोळ्यांचा कोर्स असतो. त्यामुळे डॉक्टरांनी ४ गोळ्या घेण्यास सांगितले. पण त्याचदरम्यान औषधांचा नवीन साठा आला होता, त्यामध्ये १००० मिलिग्रॅमची एक गोळी आल्याचे कम्पाउंडरला माहीत नव्हते. त्याने चुकीचा कोर्स दिल्यामुळे मी नेहमीच्या डोसपेक्षा चारपट अधिक डोस घेतला. त्यामुळे हा सगळा प्रकार घडला होता. त्या दिवशी माझी ढासळलेली अवस्था जेवून परत आल्यावर त्या डॉक्टरांच्या कानावर पडली तेव्हाच ही गडबड त्यांच्या लक्षात आली. त्यांनी लगेच तसं जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांना कळवलं. त्यामुळे मला योग्य वेळेत योग्य उपचार मिळून विघ्न टळले. माझ्या पाठीशी असलेल्या शक्तीला सलाम आणि माझी काळजी करणाऱ्या/घेणाऱ्या माझ्या सगळ्या सहकाऱ्यांना मनापासून धन्यवाद!

(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

कचरा व्यवस्थापन

पद्मजा श्रीपाद पाठक

ऑफिसमध्ये मी मुद्दाम कचरापेटी थोडी लांबच ठेवली. उद्देश एवढाच कचरापेटीमध्ये कचरा टाकण्यासाठी खास उठावे लागेल. त्यामुळे सहकाऱ्यांना त्याची जाणीव होईल आणि माझा व्यायामही होईल. आपले घर स्वच्छ ठेवण्याकडे बहुतेक आपला कल असतो. घरकाम करणाऱ्या मावशींनी एखाद दिवस स्वच्छ कचरा काढला नाही की आपला पारा किती चढतो. मग हाच विचार सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकताना आपल्या मनात का नाही येत?

जवळजवळ सहा महिन्यांनी सुरेखा आज बस स्टॉपवर भेटली. तिला बघून मला जितका आनंद झाला, त्यापेक्षा जास्त आनंद तिच्या चेहऱ्यावर मला स्पष्ट जाणवत होता. गप्पा मारता याव्यात म्हणून मुद्दाम थोड्या रिकाम्या बसमध्ये शेजारीशेजारी जागा पकडून आम्ही बसलो. सुरेखा नावाप्रमाणेच दिसायला, बोलायला, वागायला सुरेख न् सुंदर. नेहमी स्टार्चच्या सुती साडीत दिसणारी सुरेखा बोलायला लागली की, ऐकत राहावं वाटे. नुकतीच ती ४-५ महिने अमेरिकेत तिच्या लेकीकडे राहून आली होती. तिचे अनुभव ती मला मोठ्या उत्साहात सांगत होती. तिच्या स्टाइलने तिने बोलायला सुरुवात केली आणि अमेरिका माझ्या डोळ्यासमोर उभी केली. तेथील ऐश्वर्य, निसर्गसौंदर्य, लोकांची शिस्तबद्धता, स्वच्छता तसेच शॉपिंग मॉल, मोठमोठ्या इमारती, आधुनिक उपकरणे सगळ्या सगळ्याच भरभरून कौतुक करत होती. मला तर हे सर्व स्वप्नवत वाटत होतं.

गप्पांमध्ये स्टॉप जरा लवकरच आला. बसमधून उतरते वेळी सुरेखा तिथल्या सार्वजनिक ठिकाणी किती स्वच्छता असते, कचरा टाकल्यास कसा दंड होतो वगैरे सांगता तिच्या सवयीप्रमाणे, हो सवयीप्रमाणेच तिने तिचे तिकीट चुरगळून रस्त्यावर टाकले. मी माझ्या सवयीने स्टॉपजवळ असलेल्या दोन कचरा पेटींपैकी; सुका कचरा असलेल्या कचरा पेटीत माझे बसचे तिकीट चुरगळून टाकले. सुरेखाची कृती बघून माझी नाराजी तिच्याकडे व्यक्त केली. त्यावर ती मला सहजपणे म्हणाली, 'अगं, ही काही अमेरिका नाहीये. आपल्याकडे चालतं सगळं. सगळेच जण टाकतात कचरा. त्यात काय विशेष?' सुरेखाच्या या बोलण्याने मला बसलेल्या धक्क्यातून सावरेपर्यंत ती मला बाय करून निघूनही गेली. हतबल होऊन मी तिचे खाली टाकलेले तिकिट उचलून कचरापेटीत टाकले.

मी पर्समधून टिश्यू पेपर काढला. दिवसभर ऑफिसमध्ये सुरेखासारख्या मैत्रिणींचा विचार काही केल्या मनातून जाईना. संध्याकाळी ऑफिसमधून घरी जाताना लोकलमध्ये बसले. समोर बसलेल्या मुलींनी भेळ खाल्ली आणि कागद चुरगळून सिट खाली ढकलला. त्या मुलींच्या शेजारीच बसलेल्या एका मध्यमवयीन स्त्रीने आपल्या आणि स्वतःच्या पायाचे तळवे, पावलं या पेपरने स्वच्छ पुसून तो पेपर त्या मुलींप्रमाणेच सिट खाली ढकलला. मला ही दृष्ये बघून असह्य झाले. मनात आलेल्या रागावर जमेल तेवढे नियंत्रण ठेवून अतिशय शांत आणि नम्रपणे त्या मुलींना, 'असा कागद खाली टाकू नका गं,' असे सांगून पाहिले. त्या मुलींमधल्या दोघींनी कागद तर उचलला नाहीच उलट 'नेतेगिरी करू नका,' असे म्हणत माझी खिल्ली उडवली. स्वतःची पावलं स्वच्छ करणाऱ्या ललनेनेदेखील माझ्याकडे तुच्छतेनेच पाहिले. त्यातल्या एकीला कदाचित थोडी लाज वाटली असावी. तिने सिटखाली टाकलेला कागद उचलला आणि खिडकीबाहेर टाकला. कचरा लोकलमध्ये टाकला काय किंवा खिडकीबाहेर टाकला काय, शेवटी हिशोब एकच. मला खूप वाईट वाटले. बाकीच्या प्रवासी महिलांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली. त्या मुलींना माझ्या म्हणण्याचा उद्देशच कळला नाही किंवा मला तो नीट सांगता आला नाही. मी त्यांना समजावून सांगण्यात कमी पडले एवढं मात्र नक्की.

लोकल प्रवास संपला. ऑटोमध्ये बसून घराकडे जायला निघाले. ड्रायव्हरचे तोंड पानाच्या तोबऱ्याने भरलेले. सिग्नलला रिक्षा थांबली की, बाहेर तोंड काढून त्याचं थुंकणं चालूच. त्याचा हा थुंकण्याचा एपिसोड माझे घर येईपर्यंत चालू होता. मला त्याला बोलण्याची खूप इच्छा होत होती. परंतु लोकलमधल्या अनुभवाने माझी हिंमतच झाली नाही.

सुरेखामुळे आज मला हे सर्व प्रसंग प्रखरतेने जाणवत होते. दररोज मी अनेक लोकांना रस्त्यात कचरा टाकताना, थुकताना पाहत होते. क्वचित प्रसंगी माझ्याही नकळत माझ्याकडून एखादा कागदाचा तुकडा रस्त्यात टाकला जात होता. विशेष काही घडलेलंच नसल्याचा आम्हा प्रत्येकाचा बघण्याचा दृष्टिकोन किती चुकीचा आहे, हे मला सुरेखाच्या बेफिकीर वागण्यामुळे लक्षात येत होते.

स्वच्छता आपल्याला प्रत्येकाला हवी आहे, त्यासाठी घ्यावयाचे कष्ट मात्र आम्ही फक्त घरापुरतेच, आपल्या ऑफिस, दुकानापुरतेच घेतो. घरातून बाहेर पडलो की, आपली वृत्ती आपोआपच बदलते. त्यात 'काय झालं एखादा कागद रस्त्यात टाकला तर? एवढा कचरा आहे, त्यात आणखी थोडा.' ही मानसिकता घरातून बाहेर पडलो की, आपल्याही नकळत आपल्यात भिनत असते.

दिवसभर घडलेल्या या सर्व प्रसंगांबाबत मी माझ्या मैत्रिणींशी, घरच्यांशी चर्चा केली. सर्वात मोठा पाठिंबा मुलांनी प्रथम दिला. मुलं खूप उत्साही होती. घरात किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा पेटीशिवाय कचरा कुठेही ती टाकत नव्हती. कचरा पेटी दिसली नाही तर दप्तरातून चक्क कचरा घरी घेऊन आणून, घरातल्या कचरापेटीमध्ये टाकत होती. स्वच्छतेची सुरुवात माझी घरापासूनच झाली. दोन-तीन मैत्रिणींनीदेखील मला दिलासा दिला. त्यामुळे माझ्यात थोडासा आत्मविश्वास आला. आत्मविश्वास जरी वाढला तरी माझ्या कमकुवत मानसिकतेमध्ये लोकलमधल्या अनुभवाची कटुता जात नव्हती. अपरिचितांना कचरा टाकू नये सांगणे मला कष्टाचे, अवघड वाटू लागले. शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना इत्यादींना सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवताना पाहून मला त्यांचे खूप कौतुक वाटे. या अभियानांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या इवल्याशा हातांनी रेल्वे फलाटावरील, स्टेशनवरील कचरा साफ करताना बघून हे धाडस आपल्यात नाही याची खंत वाटे. मला काहीतरी केलेच पाहिजे, ही भावना वाढीस लागली.

अपरिचितांना आपण सांगू नाही शकलो तरी नातेवाईक, मित्रपरिवारांत स्वच्छतेबाबत सांगू शकतो, हे मनात रुजत गेले आणि माझा निश्चय पक्का झाला.

सकाळी नेहमीप्रमाणे घरची कामे आटोपून ऑफिसला जायला निघाले. प्रथम गेटजवळ वॉचमन काका दिसले. त्यांचा मंगळवार, गुरुवार आणि शनिवार हे तीन दिवस उपवास असतो हे मला ठाऊक होते. त्यामुळे त्यांना नम्रपणे सांगितले, काका, आजपासून आठवड्यातून किमान तीन दिवस म्हणजेच मंगळवार, गुरुवार आणि शनिवार हे तीन दिवस तरी आपण दोघे रस्त्यात, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकण्याचा निश्चय करू या. तुमच्या उपवासाचाच एक भाग समजा.

जशी काकांना विनंती केली, तशीच माझ्याजवळच्या मित्र-मैत्रिणींनादेखील त्यांचा ज्या दिवशी उपवास वगैरे असतो त्या दिवशी कचरा न टाकण्याची आणि सार्वजनिक ठिकाणी न भुंकण्याची मी विनंती केली. मनात विचार केला, सुरुवातीला उपवासाचे दिवस धरले तर निदान सुरुवात तरी होईल. नंतर त्यांनाच स्वच्छतेचे महत्त्व पटेल आणि उपवासाच्या दिवसांचा आधार न घेताच आठवड्याचे सर्व दिवस स्वच्छतेचे होतील.

आपले घर स्वच्छ ठेवण्याकडे बहुतेक आपला कल असतो. घरकाम करणाऱ्या मावशींनी एखाद दिवस स्वच्छ कचरा काढला नाही की, आपला पारा किती चढतो. मग हाच विचार सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकताना आपल्या मनात का नाही येत? कारण आपल्या अवतीभोवती जशा अनेक सुरेखा आहेत, त्याचप्रमाणे आपल्यामध्येदेखील काही प्रमाणात सुरेखा दडलेली आहे. दुसऱ्या देशातल्या स्वच्छतेचे कौतुक भरभरून करताना आपण मात्र, आपल्या परिसराच्या स्वच्छतेबाबत फार उदासीन असतो. ही जाणीव मला तीव्रतेने होऊ लागली.

मी निश्चय केला की, या क्षणापासून आपण सार्वजनिक ठिकाणी कचरा कटाक्षाने टाकायचा नाही. तो फक्त कचरापेटीमध्येच टाकायचा. आपल्यात सार्वजनिक ठिकाणी जाऊन साफसफाई करण्याचे धाडस नक्कीच नाही. इतरांना रस्त्यात कचरा टाकू नये वगैरे सांगणेदेखील मला जमत नाही. मग निदान स्वतः कचरा न टाकण्याचा निश्चय करून, तो अमलात आणणे तर माझ्या हातात आहे.

मॉर्निंग वॉकला जाणे, व्यायाम करणे, माझ्या वजनाने वजनकाटा मोडणार नाही याची काळजी घेणे, कोणाशीच वाद न घालणे, नम्रपणे बोलणे, आनंदी राहणे असे कितीतरी निश्चय मी कित्येक वेळा केले, मोडले आणि पुन्हा नव्याने केले, परंतु माझ्यापुरता मी केलेला कचरा न करणे अभियानाचा निश्चय मात्र, नेहमीच्या निश्चयांना अपवाद ठरवला आहे.

(निवृत्त शासकीय अधिकारी.)

ई-पेपर/ई-बुक

प्राचीन काळी लिहिण्याची साधने नव्हती, तेव्हा दगडावर, ताम्रपटावर, भूर्जपत्रावर लिहिण्याची पद्धत होती. त्यानंतर छपाईचा शोध लागल्यावर पेपरवर लिहिण्याची पद्धत सुरू झाली. यासाठी लाकडाच्या लगद्याचा उपयोग केला जातो. या पद्धतीत पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो. तसेच दळणवळणातही खर्च होतो.

याला पर्याय म्हणजे इलेक्ट्रॉनिक पेपर. खरतर हे एक डिस्प्ले डिव्हाईस आहे. वाचताना त्रास होऊ नये, म्हणून ते वाचकास वाचण्यास आरामदायक केलेले असत. याचा कॉन्ट्रास्ट रेशो वर्तमानपत्राइतका असतो. चांगले ई-पेपर डिस्प्ले वर्तमानपत्राप्रमाणे सूर्य प्रकाशातही वाचता येतात. याचा महत्त्वाचा उपयोग म्हणजे हे इलेक्ट्रॉनिक माध्यम असल्यामुळे दळणवळणाचा खर्च शून्य आणि वेगवान झाला आहे.

सामान्य पुस्तक वाचताना शब्द, अर्थ याची अडचण आली, तर तुम्हाला संदर्भ शोधावे लागतात, परंतु ई-पेपर/ई-बुक मुळे या सर्व बाबी तुमच्या डिव्हाईसवर उपलब्ध होतात. अनेक वर्तमानपत्र, पुस्तके आता ई-पेपर स्वरूपात उपलब्ध होत असल्यामुळे त्याचे जतन करणेही सोपे झाले आहे. तरुणाईत ई-रिडर खूप लोकप्रिय आहे. त्यात किंडलसारख्या साधनांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. असा पहिला ई-रिडर सन १९८० ते १९९०च्या दरम्यान तयार केला गेला. त्यात अनेक बदल होत प्रिंट पेपरसारखीच गुणवत्ता असलेला आजचा आधुनिक ई-पेपर बघायला मिळतो.

टीम आपलं मंत्रालय

अन्नदाता सुखी भव्

डॉ. सुरेखा मधुकर मुळे

यंदा २९ ऑगस्टला मुंबईत तुफान पाऊस बरसला, मुंबईची लाईफ लाईन ठप्प झाली. पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वे सेवा बंद झाल्याने मुंबई शहरात कामानिमित्ताने आलेली नोकरदार मंडळी कार्यालयांमध्ये अडकून पडली. सर्वसामान्य मुंबईकरांप्रमाणे मंत्रालयात नोकरी करणारा कर्मचारीवर्गही त्याला अपवाद नव्हता. मंत्रालयाच्या मुख्य आणि प्रशासकीय इमारतीत फार मोठ्या संख्येने कर्मचारी–अधिकारी काम करतात. ठाणे, नवी मुंबई, पनवेल डोंबिवली, विरार, पालघर, शहापूर, उल्हासनगर, बोरिवली, कर्जत अशा विविध भागांतून मंत्रालयात दररोजच्या ड्युटीसाठी अनेकजण येतात. २९ ऑगस्टलासुद्धा ते तसेच आले होते; पण सतत पडणारा मुसळधार पाऊस, बंद पडलेल्या ट्रेन यामुळे त्यांना घरी जाता आलं नाही आणि ते मंत्रालयातच अडकून पडले.

पावसाची संततधार, दाटून आलेलं आभाळ, सतर्कतेचे येणारे संदेश, बंद पडलेल्या ट्रेनस्, ट्रॅफिक जॅम या सगळ्याचा विचार करून बहुतांश मंडळींनी रात्री मंत्रालयातच मुक्काम करण्याचा निर्णय घेतला. खरं तर अशावेळी मंत्रालयासारखा सुरक्षित निवारा नाही हे त्यांनाही मान्य होतं. मंत्रालयात राहण्याचा निर्णय घेतला खरं; पण संध्याकाळच्या जेवणाचे काय? कारण दुपारचे डबे तर खाऊन झाले होते मग आता करायचं काय? सगळ्यांच्याच मनात हा विचार आला असताना कॅन्टिन सुरू असून तिथे गरमागरम कांद्याची भजी आणि इतर नाश्ता मिळत असल्याची बातमी सायंकाळी चार साडेचारच्या सुमारास कानावर आली.

अरे व्वा! कर्मचाऱ्यांचे शब्द कानावर पडले. मंत्रालय उपाहारगृहात गरमागरम भजी, उपमा, ब्रेड बटर, सॅण्डविच, चहा–कॉफी, सगळंच मिळत गेलं.

आता संध्याकाळी जेवायला नाही मिळालं तरी चालेल, असं वाटत असतानाच उपाहारगृहात रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आल्याची नवी बातमी कळाली. सुखाचा आणि समाधानाचा मार्ग पोटातून जातो असं म्हणतात, ज्यांना जेवणाचे काय होईल, ही भीती सतावत होती, त्यांचीही काळजी दूर झाली.

खरंतर उपाहारगृहातला सकाळच्या पहिल्या शिफ्टचा स्टाफ घरी निघून गेला होता. दुसऱ्या शिफ्टचे काहीजण आले नव्हते. त्यामुळे उपलब्ध असलेल्या उपाहारगृह कर्मचाऱ्यांच्या मदतीने चक्क दोन–अडीच हजार अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी जेवण तयार झाले. उपहारगृहाचे जे क्लास फोर कर्मचारी बढती मिळून क्लास थ्रीमध्ये गेले होते, त्यांनी टॉप क्लास सहकार्य दिलं आणि सगळ्यांचीच भूक भागवली. या सगळ्या ज्ञात–अज्ञान हातांचे ऋण मान्य करण्यासाठी मी या सगळ्यांशी बोलले. अगदी स्वयंपाकघरात जाऊन भात शिजवणाऱ्या माणसापासून जेवणावर ताव मारणाऱ्या कर्मचारी–अधिकाऱ्यांसह या सर्वाचे यशस्वी नियोजन करणाऱ्या उपाहारगृह महाव्यवस्थापकांपर्यंत सगळ्यांची भेट घेतली. जेवणाचा लाभ मिळाल्याने आनंदित झालेल्या कर्मचाऱ्यांनी कशासाठी 'अन्नदाता सुखी भव्' म्हटलं हेही जाणून घेतलं. या सर्वांची प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात..

जोपर्यंत अधिकारी–कर्मचारी जेवायला येतील.

तोपर्यंत आम्ही सेवा देणार.

दादासाहेब खताळ, महाव्यवस्थापक मंत्रालय उपाहारगृह.

सकाळपासून सतत पाऊस पडत होता. दुपारी तिन्ही मार्गावरील ट्रेन बंद पडल्याची माहिती मिळाली. घरी जाण्याचं कोणतंच साधन उपलब्ध नसल्याने आता मंत्रालय आणि प्रशासकीय इमारतीतील अधिकारी–कर्मचारी घरी जाऊ शकणार नाहीत हे स्पष्ट झाले. जे कर्मचारी चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशनला गेले होते, तेही परत मंत्रालयात येऊ लागले. मग आपत्कालीन परिस्थितीचा विचार करत आम्ही सायंकाळी चार वाजता भजी, उपमा, शिरा, सॅण्डविच, चहा–कॉफी, बिस्किट असा नाश्ता देण्यास सुरुवात केली. साधारणत: ८०० ते ९०० लोकांनी या अल्पोपहाराचा लाभ घेतला. जस–जसा वेळ गेला, तसं–तशी परिस्थिती आणखीनच बिकट होत असल्याचे लक्षात आले. लोकांना घरी जाता येत नव्हते. त्यांच्या रात्रीच्या जेवणाची सोय करणे भाग होते. उपाहारगृहातील सकाळच्या पाळीतले अर्धे कर्मचारी घरी गेले होते. ट्रेन बंद पडल्याने दुपारच्या पाळीतील काहीजण येऊ शकले नव्हते, याची जाणीव होती, तरीही कर्मचारी–अधिकाऱ्यांच्या रात्रीच्या जेवणाचे काम नियोजनपूर्वक करण्याचे मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी ठरवले मुख्य दोन आचारी, तीन–चार साहाय्यक आचारी, हेल्पर अशा दहा ते बारा जणांच्या टीमने रात्रीचे जेवण तयार करण्याचा निर्णय घेतला. तत्काळ बनवता येऊ शकेल, अशा पद्धतीने भात, पिठलं, पापड, लोणचं आणि

तळलेल्या मिरच्या असा साधाच मेनू निश्चित केला. महेंद्र जाधव, शिवाजी आव्हाड, धर्मचंद जाधव या माझ्या सहकाऱ्यांची मला मदत झाली. आमचा अंदाज होता की, जेवणासाठी मंत्रालय आणि प्रशासकीय इमारतीतील मिळून दीड ते दोन हजार अधिकारी–कर्मचारी जेवणास येतील. प्रत्यक्षात कामानिमित्ताने आलेले आणि नंतर मंत्रालयातच अडकून पडलेले इतर लोकही नाश्ता आणि जेवणासाठी उपाहारगृहात आले. त्यांनाही नाश्ता, जेवण देणं कर्तव्यच होतं. नव्हे ती मनोमन इच्छाही होती. एकदम चांगली नाही; पण थोडी तरी चांगली जेवणाची सोय व्हावी, हा उद्देश होता. माझा उपाहारगृहातला क्लास फोर स्टाफ जो बढती घेऊन क्लास थ्रीमध्ये गेला होता. त्यात भरत वाझे, रघुनाथ महाडिक, शरद कासारे, सुधाकर कासारे पुरंदर करकेरा, सीताराम माझे, सुबोध शिर्के, दिनानाथ पारधी यांना मी सहकार्याची साद घातली. त्यांनी टॉप क्लास सहकार्य केलं. स्वखुशीने ते या कामात सहभागी झाले. साधारणत: दोन ते अडीच हजार लोक जेवतील एवढी आम्ही तयारी केली. सातवाजता स्वयंपाकाला सुरुवात केली. आठ ते सव्वा आठ वाजता आम्ही अधिकारी–कर्मचाऱ्यांना गरमागरम भात, पिटले, लोणचं आणि पापड असं जेवण देण्यास

सुरुवात केली. आतापर्यंत दीड हजारांपेक्षा अधिक अधिकारी–कर्मचारी जेवले आहेत. तुम्हाला सांगतो मॅडम, जोपर्यंत अधिकारी–कर्मचारी जेवणासाठी उपाहारगृहात येतील, तोपर्यंत आम्ही त्यांना सेवा देण्याचा प्रयत्न करणार. मंत्रालय उपाहारगृहाचे महाव्यवस्थापक दादासाहेब खताळ बोलत होते, मी त्यांची ही धावपळ आणि गरम जेवण मिळाल्याने अधिकारी–कर्मचाऱ्यांचे समाधानी चेहरे माझ्या कॅमेऱ्यात बंदिस्त केले होतेच; तरीही न राहून विचारलं, 'इतके लोक एकावेळी जेवू शकतील एवढी सामग्री असते का आपल्याकडे?' यावर सर्वसाधारणपणे जेवण तयार करण्याच्या सगळ्या वस्तू आपल्याकडे असतात. भाजी दर दिवशी सकाळी येते. त्यामुळे ती आता रात्री देणं आम्हाला जमल नाही आणि कडधान्य भिजायला कमीत कमी दोन ते तीन तासाचा वेळ जातो. ते ही शक्य नव्हतं म्हणून मग आम्ही पिठलं, वरण आणि भात देण्याचा निर्णय घेतला. श्री. खताळ यांनी सांगितलं, मनात विचार आला उत्तम नियोजनातून अमलात आणलेला एक चांगला निर्णय, सहकार्याचे अनेक हात अडचणीत असलेल्या किती लोकांना मदत करू शकतात, याचं हे उत्तम उदाहरण आहे.

अर्थात मीही मंत्रालय अधिकारीच असल्याने या गरमागरम वरण–भाताचा लाभ घेतला हे वेगळ्याने सांगायला नको.

(निवृत्त उपसंचालक, माहिती व जनसंपर्क.)

प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते

दररोज संध्याकाळी जीमवरून परतताना एक मावशी डबे घेऊन रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फळवाल्याकडे ठेवून जायची. त्याच्याकडील रिकामे डबे घेऊन माघारी परतायची. एकदा फळे घेताना तिची मुद्दाम चौकशी त्याच्याकडे केली. ती जेवणाचे डबे पुरविते, असे समजले. एके दिवशी तिच्याशी बोलल्यावर दररोजच्या डब्यांसह पार्टीच्या विशेष जेवणाची ऑर्डरही ती घेते, हे समजले. लगेचच कार्यालयातील सर्वांसाठी जेवण ठेवले आणि तिला त्याची ऑर्डर दिली. बडा खाना. त्यानंतर एके दिवशी ती कसल्यातरी दाखल्यासाठी आलेली. 'नेहमीसारखे आता संध्याकाळी दिसत नाही तुम्ही..' असे मी विचारताच, 'एका हाटेलवर कामाला जातेय', म्हणाली. 'डबेही पहिल्यासारखे नाहीत आता.. पोटाला तीन मुलीच आहेत साहेब..' अशी तिने आपल्या परिस्थितीची कैफियत मांडली. जाताना, 'मॅडमचे काही जुने ड्रेस असतील, तर देण्याची' तिने विनंती केली.

'सौ इंदौरला असते. मी गेलो की घेऊन येईन.. आठवणीने,' असे तिला आश्वासन दिले. मला माझे बालपण आठवले. माझ्याही घरी चौघींच्यानंतर आई–अण्णांना मी झालेलो. तिच्या परिस्थितीची मला जाणीव झाली.

तोंडावर दिवाळी आलेली. कार्यालयात एक दाक्षिणात्य कपडेवाला गाठोडं घेऊन दररोज ठिय्या मांडून होता. तो सर्व कार्यालयांच्या गळी पडून, खरेदी करण्यासाठी आर्जव करी. ते पाहून एके दिवशी कार्यालयातील सर्वांसाठीच खरेदी केली. जाणीवपूर्वक मावशीच्या मुलींसाठीही ड्रेस मटेरियल जाणीवपूर्वक खरेदी केले आणि तिच्याकडे पाठवून दिले.

हरवलेली परंपरा

दिवाळीला मी इंदौरला गेलो होतो. येताना आठवणीने सौ. शी बोलून मी तिच्याकडे जुने ड्रेस, साड्या मागितल्या. तिनेही अगदी ढिगभर काढून दिल्या. ते एकावेळी सोबत घेऊन जाणे मला अशक्य वाटल्याने, केवळ दोन बॅगेत मावतील इतके घेऊन मी माघारी परतलो. शिवाय 'जुन्या कपड्यांसह नवीनही घेऊन दे तिला' असे सांगायलाही सौ. अजिबात विसरली नाही. तसे मी अगोदरच केल्याचे तिला सांगितले.

कुठे फिरायला जायचे म्हणजे कपड्यांची वेगळी खरेदी हमखास आलीच! दररोजचे कपडे वेगळे. सहजच एखाद्या कपड्याचा 'पिसारा' आवडला की, तो आपण विकत घेतो. मग अल्पावधीतच त्याचाही 'पसारा' होऊन जातो. बरे त्यातही आपण विसरून जातो. अनेकदा त्याचा वापर होत नाही. तो कुठेतरी तळाशी लपून बसलेला असतो.

'आपण स्वत:हून 'फीट' राहिलो नाही, तर कपडे स्वत:हून 'फिट' होतात'. यातून 'कपाट तटतटून फुगलेलं'. गलेलठ्ठ बोक्याप्रमाणे लठ्ठ बनत राहिलेलं. ढेरीवरच्या ताणलेल्या बटनांमुळे विस्फारलेल्या शर्टासारखी कपाटाची कवाडं किलकिली राहिलेली.

लहानपणी परिस्थितीमुळे कपड्यांची वानवा असायची. नवे कपडे

तसे दिवाळीलाच मिळायचे. तेही आजी, कधी मामांकडून मिळत. शिवाय जीर्ण होईपर्यंत ते वापरले जात. त्यानंतर त्या कपड्यांची वाकळेत, गोधडीत स्मारके होत वा अगदीच नव्या भांड्यांच्या बदल्यात ती 'बोहारणी'च्या गाठोड्यात निद्रिस्त होत.

'बोहारीण.!' मला आजही आठवते 'भांडऽऽऽ योऽऽऽ..' अशी आरोळी दुपारच्या वेळी यायची. सकाळची जेवणं आवरून, भांडी घासून समस्त महिलावर्ग दुपारी आडवा झालेला असायचा. याचवेळी ही आरोळी आडव्यांना उभे करून जायची. उंबऱ्यातून बाहेर आल्यावर समजायचे आरोळी देणारा वा देणारी, अजून पलीकडच्या गल्लीतच आहे. आपल्या गल्लीत यायची आहे. नव्या चकचकीत भांड्यांच्या अभिलाषेने घरातील जुन्या कपड्यांवर नजर नुसती भिरभिरायची. जुन्या कपड्यांवर पडलेल्या नजरेला यावेळी ते कपडे मात्र, पुन्हा नवे वाटायचे. 'देऊ की नको' या द्विधा मन:स्थितीत अडकलेल्या नजरेला बऱ्याचदा आठवणींच्या भावनिकतेचीही जोड असायची.

'ताई काय जुन्या साड्या.. दादांची शर्ट-पँट-इजारी हायेत का?', अशी विचारणा करत एव्हाना गोऱ्या वर्णाची कमल बोहारीण दारात उभी असायची. काखेतील कपड्यांचे गाठोडे जमिनीवर ठेवायची. डोक्यावरची भांड्यांची पाटी उतरायला हात लावायला सांगायची. डोक्यावरील चुंबळ उतरून ठेवतानाच पदराने ती घाम टिपत, दम खात खाली अघळ-पघळ बसायची. कधी-कधी घामाने वितळलेलं तिचं कुंकू तिच्या चेहऱ्याला लालसर छटा देऊन जायचं. त्यावेळी तिचे हिरवे गोंदण लक्ष वेधून घेई; पण मेणात रुतवलेला 'तो' गोंदणावरील मोठाला बंदा रुपया बहुधा आपली जागा सोडत नसे. बसकण मांडून असायचा.

'पाणी द्या जरा..' म्हणून पाण्याचा तांब्या ती जवळ करायची. वरूनच घशात पाण्याची धार सोडायची. घोट-घोट गळ्यातून उतरताना घाटीची वर-खाली होणारी हालचाल उगीचच मस्तानीची आठवण करून देई. गोऱ्या गळ्यावरील काळ्या मण्यांत गाठवलेली सोनेरी शिंपल्याची पोत सौभाग्यवती असल्याचा ठसा उमटवायची. तिच्या हातातील रांध्याच्या सोनेरी बांगड्या ती डोंगराला जाऊन आल्याचे सांगत. नेटक्या कपड्यातील बोलकी कमल अधिक खुलून दिसायची. तिच्या हसण्याने, शुभ्र रांगेतील दातांमुळे ती मोहक दिसायची.

पदराला तोंड पुसून ती सलगीने घरची चौकशी करत थेट चर्चेत घुसायची. समोर आलेली साडी, कपडे हाताने चाचपून, 'हे पार जुनेर झालंय. यात काय राम नाही बघा..' असे अनिच्छेने सर्व कपडे जवळ करायची. 'हे मोठं भाडं पायजेल तर अजून काय तरी कापडं द्या.. बघा की अजून काय हायेत..' अशी चेहऱ्यावर अजिजी आणून भरीला घालायची. एव्हाना गल्लीतल्या इतर बायका पोरंही जमा झालेली असत. घरातली कर्ती महिला आणि तिच्यात चांगली चर्चा म्हणजेच घासाघीस झालेली असायची. त्यातून दोघींचेही समाधान होईल, असा तोडगा निघायचा आणि घरमालकीण नवी भांडी घेऊन समाधान पावायची, तर बोहारीण मिळालेल्या साड्या, जुनी कपडे गाठोड्यात बांधून निघण्याची तयारी करायची. पुन्हा एकदा अर्धा राहिलेला पाण्याचा तांब्या घशाखाली रिता करून सलगीने 'च्या तरी पाजा की..' अशी लाघवी मागणी करायची. नव्या भांड्याच्या आनंदात 'त्याची घडी मोडून' ती तिच्यासाठी चहा ठेवायची. इथे व्यापारी आणि ग्राहक हे नातं कधीच नसायचं. विश्वासाचं, सखीचं, आपुलकीचं असायचं.

इतरही बायकांनी आपापल्या परीने कपडे आणून नव्या भांड्याचा व्यवहार पूर्ण केलेला असायचा. यात हक्कानं एखादा कपडा ती स्वतः साठी, पोरा-बाळांसाठीही मागायची. डोक्यावरची भांड्यांची पाटी रिकामी व्हायची, तसे तिच्या काखेतील मिळालेल्या कपड्यांचे गाठोडेही वाढत जायचे. डोक्यावरील एक ओझे उतरले तरी, दुसरे वाढलेले ओझे तिच्यासाठी आनंद देऊन जायचे.

मिळालेल्या कपड्यातील चांगले कपडे ती स्वच्छ धुवायची. काही कपड्यांची शोभेल अशी डागडुजी करायची. नगरपालिकेजवळील बोळात रविवारी बाजारच्या दिवशी त्याची विक्री करायची. रया गेलेली कपडे एमआयडीसीत मशिन पुसण्यासाठी वा चिंध्या म्हणून विकायची. त्यावर तिचा प्रपंच चालायचा.

माझ्या लहानपणी गल्लीत येणारी ही कमल केवळ बोहारीण नव्हती, तिच्या येण्याने गावा-शिवारातल्या माहितीची देवाण-घेवाण व्हायची. समस्त महिला वर्गाची ती मैत्रीण असायची. दसऱ्याच्या आणि दिवाळीच्या आधी तिचा वावर हमखास गल्लीत असायचा. गल्लीतल्या प्रत्येक घराशी तिचा जणू घरोबा निर्माण झालेला. त्यावेळी तसे फारसे पैसे नसतानाही हा व्यवहार आनंदाने व्हायचा. खेड्या-पाड्यातील मातीच्या घरातील दारात, अंगणात तिची पावले उमटलेली असायचीत. ही कमल काळाच्या गर्तेत खोलवर गायब झाली. तरीही मनात रूतून बसलेली. मावशीच्या रूपाने का होईना, ती मनातील तिचे रूतणे आज निघाले होते. तिची पुढची पिढी नक्कीच यात पडलेली नसणार. जुन्या कपड्यांचा हा नवा-पुराणा व्यवसाय तिथेच मोडला. गावकुसाबाहेरून, दूरच्या आडवाटेवरून येणारी ती ग्रामीण जीवनाच्या साधेपणाचं, काटकसरीचं जुन्या मूल्यांचं, भावनेचं एक प्रतीक होती. तिचं येणं केवळ वस्तू विनिमयाचा व्यवहार नव्हता, तर माणुसकीचा नात्यांचा विश्वासाचा आणि गरजेतून निर्माण झालेल्या सोयीचा ओलावा होता. तिच्या जाण्याने ग्रामीण जीवनशैलीचा मायेचा हळवा कोपरा कायमचा हरवला आहे. भटक्या विमुक्त जमातींमधले, समाजातील हे कमल नावाचं पात्र कुठे बहरलं अन् कुठे विसावलं हा संशोधनाचा विषय आहे.

डबेवाली मावशीला बोलावून तिच्यासाठी आणलेल्या कपड्यांची बॅग तिला दिली, तशी ती जाम हरखून गेली. अगदी कमलच्या डोक्यावरील पाटी रिकामी होऊन काखेतील कपड्यांचे गाठोडे भरल्यासारखे.

(जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी.)

रामानुजन आणि पालक

अजय भोसले

गणिताचे तीन पद्धतीने आकलन होऊ शकते. Intuition, Intelligence , Practice. प्रतिभेने गणित समजून घेणे, तर्कशुद्ध स्वरूप देणे जमू शकते. सरावाने काही मर्यादेपर्यंत गणित सोडविता येईल, परंतु गणिताचा गाभा निर्माण करता येणार नाही. गणिताचे आकलन होणे, सरावाने सोडविणे या परस्पर भिन्न गोष्टी आहेत. Intuition ही या सर्वांहून वेगळी शक्ती आहे. अंत:प्रेरणेने गणित मांडताना त्यात तर्कशुद्ध पायऱ्यांचा अभाव असला तरी फलनिष्पत्ती प्राप्त करण्याची नैसर्गिक क्षमता असते. क्षमता ही निसर्गदत्त देणगी आहे, अशी देणगी असलेले, परंतु दुर्लक्षित राहिलेले भारतीय गणितज्ज्ञ म्हणजे रामानुजन.

रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ साली तमिळनाडुमधील एका लहानशा गावात झाला. त्यानंतर शालेय शिक्षण तंजावार जिल्ह्यातील कुंभकोणम येथे झालं. शालेय शिक्षणात गणित विषयातील त्याची सर्जनशीलता अतिउच्च दर्जाची होती. गणितात विशेष कौशल्य असले तरी इतर विषयात ते थोडे कच्चे होते. विशेष प्रतिभा लाभलेल्या मुलांबाबत पालकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, बुद्धिमत्तेचे वेगवेगळे पदर असतात. एखादा विद्यार्थी एका विशिष्ट विषयात उच्च दर्जाचे प्रावीण्य दाखवत असेल व इतर विषय दुर्लक्षित करत असेल, तर पालकांनी त्याची ही प्रतिभा समजून घेतली पाहिजे व त्यास अन्य विषयाबाबत जबरदस्ती करणे, त्याच्यात अंगभूत असलेल्या गुणांना दडपण्यासारखे आहे.



भारतात काही उच्च दर्जाचे गणिती होते, परंतु त्यानंतर या विषयाचा सूक्ष्म अभ्यास झालेला नाही. वेद, पुराण, संतसाहित्य यापलीकडे सत्याचा भौतिक स्तरावर खोलवर शोध घेऊन विविध विषयात कौशल्य प्राप्त करता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. कायम एकसुरी पद्धतीच्या विचारांचा मारा झाल्यामुळे विद्यार्थी स्वतंत्र बुद्धीने विचार करण्यास अपयशी ठरत होते. अशावेळी रामानुजन यांच्यात उपजत असलेले कौशल्य डॉक्टर हार्डी यांनी, त्याची गुणवत्ता ओळखून फुलवत नेले नसते, तर हा बुद्धिमान गणिती कायम दुर्लक्षित राहिला असता. उच्च दर्जाची प्रतिभा संपादन करण्यासाठी पोषक वातावरण आवश्यक असते असा एक समज आहे. तो सर्वस्वी खोटा नाही. रामानुजन यांना असे पोषक वातावरण मिळाले का? तर त्याचे उत्तर नाही आहे. त्यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील कपड्याच्या दुकानात काम करत. आई धार्मिक होती. त्यांचं नाव संत रामानुजा यांच्यावरून ठेवण्यात आलं होतं. अस एकंदरीत सामान्य व धार्मिक वातावरण. विज्ञान, गणित अशा विषयांचा अभ्यास करताना तर्कबद्ध, वस्तुनिष्ठ विचारांचा पाया असावा लागतो. अशा पायाचा पूर्णपणे अभाव. असे असताना त्यांच्या गणितातील गतीने, आकलनाने अचंबित व्हायला होते. एखाद्या गोष्टीचे आकलन न झाल्यास आपण त्याला दैवी देणगीचे स्वरूप देतो. रामानुजन यांना स्वत:लाही त्यांच्या घराण्याची देवी नमक्कलची त्यांच्यावर कृपा असल्याची श्रद्धा होती. निसर्ग प्रत्येकात काहीना काही प्रतिभा पेरत असतो. त्याला फुलवणे ही ज्याची त्याची जबाबदारी आहे. पोषक वातावरण हा असे ज्ञान वृद्धिंगत होण्याचा एक घटक आहे. रामानुजन यांच्याबाबतीत मात्र सर्वस्वी विसंगत वातावरणाचा काही परिणाम झाला नाही. याचा अर्थ सर्वकाही जादूने होत होते असं नाही. त्यांचे गणिताबाबत अखंड चिंतन सुरूच असे. कोणतेही शास्त्र अखंड चिंतनाशिवाय टोकदार, सहज होऊ शकत नाही.

तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे काय? एखाद्या संख्येला शून्याने भागल्यावर काय होईल. हा भागाकार संपत नाही. अनंत असतो. रामानुजन याला लहानपणीच असे प्रश्न पडत. प्रतिभावान मुले आणि इतर मुले यातला मूलभूत फरक हा आहे की, त्यांना प्रश्नच पडत नाही. याला सर्वस्वी विद्यार्थ्यांना दोषी धरता येणार नाही. आपल्या शिक्षण व समाजव्यवस्थेने विद्यार्थ्यांची प्रश्न विचारायची नैसर्गिक जिज्ञासा दडपून टाकली आहे. रामानुजन यांना काहीही न वाचता नैसर्गिकरीत्या सर्वकाही येत होते काय? त्यांच्यात उपजत गुणवत्ता नक्कीच होती. तेवढी पुरेशी नसते. त्याला योग्य आकार देण्यासाठी वाचन, चिंतन अनिवार्य आहे. त्यांच्याही लहानपणी असेच एक गणिताचे पुस्तक त्याच्या वाचनात आले होते.

रामानुजन यांनी डॉक्टर हार्डी यांना १९१३ साली लिहिलेल्या पत्रावरून असे स्पष्ट होते की, त्यांनी कोणतेही विद्यापीठीय शिक्षण घेतलेले नव्हते. त्यामुळे साचेबंद किंवा नियमित गणिताचा त्यांना अभ्यास नव्हता. रामानुजन यांच्या पद्धतीवरून असे दिसून येते की, गणित सोडवण्याकरिता ज्या पायऱ्या आवश्यक असतात त्या गाळून ते थेट निष्कर्षाप्रत येते. या सर्वांचे कारण त्यांचे शुद्ध गणिताचे शिक्षण झालेले नव्हते, परंतु त्यांच्यात उपजत असलेल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांना गणितात विशेष समस्या येत नसत. त्यांच्या पत्रावरून असे दिसते. गरिबीमुळे अन्न हीच त्यांची प्रथम गरज होती. पुढे इंग्लंडला गेल्यावर तेथील वातावरण त्यांना मानवले नाही. शाकाहारी असल्यामुळे अन्नाची फार आबाळ होत असे. अशाही परिस्थितीत गणिताची उर्मी त्यांना स्वस्थ बसून देत नव्हती. डॉक्टर हार्डी यांनी त्यांच्यातील गणिताची नैसर्गिक गुणवत्ता हेरली होती. त्यास जराही बाधा येऊ न देता त्यांच्याकडून गणिताचे प्रगत काम त्यांनी कौशल्याने करून घेतले.

पालकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, गुणवत्ता ही उपजत असली तरी विशेष प्रशिक्षणाने ती फुलविता येते. अन्यथा अशा विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष होऊन ते आपली दिशा चुकू शकतात. आपल्या मुलाची नेमकी काय गुणवत्ता आहे, हे जाणून घेण्याचे कसब पालकात आवश्यक आहे. पालक त्याचे विविध विषयातील आकलन विचारात घेऊन पुढील दिशा निश्चित करू शकतात. जरूरी नाही की, विद्यार्थी सर्वच विषयात हुशार असेल, परंतु असा एखादा विषय असेल, ज्यात त्याच्या एवढी उंची कोणीही गाठू शकणार नाही.

रामानुजन यांनी गणितातील मूळ संख्या, श्रेणी यावर बरेच काम केले आहे. या गणिताचा व्यवहारात नेमका काय उपयोग होतो, असा प्रश्न पडत असेल. संगणकात तर अशा अभ्यासाची फार आवश्यकता असते. गणिताचा वापर करून तंत्रज्ञान विकसित करण्यात येते. गणित, विज्ञान यातील कागदावर मांडलेल्या संकल्पना भविष्यातील तंत्रज्ञानाचा पाया असू शकतो. हे ज्ञान विकसित करण्याकरिता तुमची बुद्धी, एक वही, एक पेन पुरेसे आहे. याच्या आधारे अनेक संकल्पना तुम्ही बसल्या जागी विकसित करू शकता. रामानुजन हे एक उपजत नैसर्गिक बुद्धिमत्ता प्राप्त झालेले वेगळे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याइतकी बुद्धिमत्ता एखाद्यात नसेल तर वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. कदाचित गणिताशिवाय इतर विषयात तुमचा मुलगा अत्यंत प्रतिभावान असू शकतो, हे वेळेवर तुम्ही ओळखले पाहिजे.

(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)

संस्कृत सुभाषित

परोपदेशवेलायां शिष्टा: सर्वे भवन्ति वै ।
विस्मरन्ति तु शिष्टत्वं स्वकार्ये समुपस्थिते ।।

दुसऱ्याला उपदेश करण्याची वेळ आली की, सर्वजण शहाणे बनतात, परंतु आपले काम उपस्थित झाले असता त्या वेळी मात्र ते शहाणपण विसरून जातात.

विठ्ठल रखुमाई

सकाळची रेल्वे स्टेशनवरची लगबग. बेशिस्तीतल्या शिस्तीनं चालणारी हजारो माणसं, अगणित विचारचक्र. त्या गर्दीला सवयीने झेलत, माझ्या विचारचक्रांचा गुंता सोडवत चाललो होतो. विचार कसले? तर या गर्दीच्या डोक्यात आता नेमके कसले विचार चालले असतील याचे. खरंच! माणसांना आपल्यापेक्षा इतरांच्या पंचायती फार. मीही त्याला अपवाद कसा असणार?

त्या गर्दीत माझे डोळे, नेहमी असणाऱ्या एका म्हातारा–म्हातारीला शोधत होते. नेहमी असायचे. मी यायचो तेव्हा ते दोघे दिसायचे. कपडे नीटनेटके. गौर वर्णाचे, छोट्या चणीचे आजोबा. डोळ्यात हतबलता आणि हातात एक तंबोरा, माथी विठ्ठलाचा टिळा. विटेवर मख्ख उभ्या असलेल्या विठ्ठलाला साद घालत जगण्यासाठी गाणे आणि त्यांच्या रखुमाईने निमूटपणे साद देणे, हा त्यांचा रेल्वे स्टेशनवरील नित्यक्रम. लोकांना त्यांच्या परिप्रेक्ष्यातून ते जसे दिसते, तशा वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत. कुणी हात जोडे, कुणी दान (भीक) देई, कुणी उपेक्षेने बोले, कुणी दुर्लक्ष करे. विठ्ठल रखुमाईच ती निमूट उभी राहत.

मला नेहमी प्रश्न पडे की, या आजोबा–आजींना या वयात येथे का यावे लागते? त्यांना मुलंबाळं, नातेवाईक नसतील का? आज जरा लवकर आलो होतो. नेहमीसारखा हाच विचार मनात चालला होता. इतक्यात ते आजोबा–आजी समोरून येताना दिसले. नेहमी दोघेच दिसायचे. आज त्यांच्यासोबत एक तरुण–तरुणी दिसत होते. त्यांना चालण्यास मदत करत होते. वा! माणुसकी जिवंत आहे अजून तर! माझ्या मनात विचार येतो न येतो, तर कुणाच्या तरी कुजबुजण्याचा आवाज आला ''तो म्हाताऱ्याचा मुलगा आणि ती सून. रोज इथंच भीक मागायला घेऊन येतात त्यांना स्टेशनवर.''

प्रभावी संवादाची गरज

सविता दि. सावंत

मंत्रालय हे राज्य शासनाचे प्रमुख अंग आहे. लोकशाही हा घटनेचा कणा आहे. घटनेनुसार राज्य शासनाचे कामकाज चालू असते. संविधानातील मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे यांची सांगड घालून त्यातील विविध अनुच्छेदाचे पालन करणे बंधनकारक आहे.

अशा घटनेनुसार शासकीय काम हे लोकांची मागणी व त्यांच्याशी संबंधित शासकीय नियम यांचे सर्वंकष विचार करून लोकशाहीची जपणूक करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे शासकीयदृष्ट्या हे कामकाज सुलभ होऊन लोकाभिमुख निर्णय घेण्याबाबत दृढता वाढेल व लोकांचा विश्वास संपादन करता येईल.

आजकाल अनेक प्रसारमाध्यमे, संगणक प्रणाली, संकेतस्थळ, मोबाइल (भ्रमणध्वनी) मुळे सर्व जग सजग झाले असून, लोकांनाही शासकीय कामकाज व घटनात्मक मूल्ये यांची चांगलीच जाण येऊ लागली आहे. त्यामुळे केवळ निःस्वार्थ भावनेने व मानवतेच्या दृष्टिकोनातून प्रस्ताव हाताळले गेले. अर्थातच उचित नियमांचे पालन, तथापि काही प्रसंगी योग्य, आवश्यक तेथे उचित प्रमाणाएवढी शिथिलता केल्यास नक्कीच शासकीय कामकाजाची पोचपावती जनतेकडून मिळाल्याशिवाय रहाणार नाही.

सरकारी नोकरशहा, अधिकारी व कर्मचारीवृंद यांच्यात उत्तम संवाद घडून, एखाद्या प्रकरणी निश्चित उचित निर्णय घेतला जाऊन शासकीय कामाचा दर्जा उंचावेल. त्याकरिता व्हिडिओ कॉन्फरसिंग हे उत्कृष्ट संवादाचे, दृक्‌श्राव्य माध्यमाचे कार्य करत असून, त्याद्वारे वेळेची बचत करणे शक्य आहे. त्यामुळे विविध राष्ट्रातील व तेथील शासकीय प्रणालींचा अभ्यास करून लोकशाहीचे अवमूल्यन न होता, शासकीय कामकाज प्रभावी होऊन विलंबास प्रतिबंध होईल.

वास्तववादी दृष्टिकोन, भौगोलिक परिस्थिती व त्याचा जनमानसावरील सर्वंकष परिमाण यांचा विचार होऊन अनेक शासकीय योजना प्रभावीपणे राबवला जाऊन; त्या केवळ काल्पनिक न राहता प्रत्यक्षात कार्यान्वित होतील.

भारत हा विकसनशील देश असून विकासाचा टप्पा गाठत येथील युवाशक्ती, त्यांचे स्तुत्य उपक्रम व अनुभवाची जोड-उपलब्ध आर्थिक परिस्थितीचा योग्य कारणासाठी वापर, अत्यावश्यक गोष्टीसाठी योजनाबद्ध नियोजन, अर्धवट प्रकल्प पूर्ण करणे. तद्‌नंतरच नवीन प्रकल्प हाती घेण्याची उपक्रमशीलता निश्चितच शासकीय कामाकाजाचा दर्जा उंचावेल आणि प्रकरणे लाल फितीत अडकून राहणार नाहीत.

(कक्ष अधिकारी, वित्त विभाग.)

हास्य नगरी

(सर्व व्यंगचित्रे : कै. राजेंद्र सरग, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

बोल हरिपाठाचे...

श्री ज्ञानेश्वर महाराज लिखित हरिपाठामध्ये २७ अभंग असून, 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी' हा हरिपाठातील पहिला अभंग आहे. हरिपाठातील प्रत्येक अभंगानंतर 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ।।' ही ओळ ध्रुवपदातून येते.

हरिपाठातील एक अभंग (तिसरा)

त्रिगुण असार निर्गुण हें सार। सारासार विचार हरिपाठ ।। १ ।।
सगुण निर्गुण गुणाचें अगुण। हरिविण मन व्यर्थ जाय।। २ ।।
अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार। जेथोनी चराचर हरीसी भजे ।। ३ ।।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं। अनंत जन्मोनी पुण्य होय ।। ४ ।।

काही म्हणी, काही उखाणे...

म्हणी

१. काळी गाय, काटे खाय, पण पाण्याला पाहून उभी रहाय. (वहाण)

अर्थ : वहाणा पायांत घालणारा मनुष्य काट्याकुट्यांतून चालला तरी काटे शिरून तिच्यातच मोडतात; पण माणसाच्या पायांत शिरत नाहीत. नदीनाल्याजवळ आल्यावर माणसे आपल्या वहाणा भिजू नयेत, म्हणून उभे राहून चटकन त्या पायांतून काढून हातात घेतात. या अनुभवातून हे कोडे निर्माण केलेले आहे.

२. साता समुद्रापलीकडे रामाने लावले अळे, त्यावर दोनच फळे.

(सूर्य, चंद्र)

३. एवढीशी पोर, ओझे घेई थोर.(चुंबळ)

अर्थ : डोक्यावर चुंबळ ठेवून तिच्यावर ओझे घेतले म्हणजे थोडे जास्त ओझे असले तरी नेववते.

४.फूल आहे, पण वास येत नाही ४ उपयोग रोज केला, तरी सुकत नाही

(डोक्यात घालायचे 'फूल' : एक दागिना)

५. छोटेसे घर त्यात पन्नास नारी। अंतर्भाव त्यांचा तापट भारी ।

(काडेपेटी)

उखाणे

१. लावीत होते कुंकू, त्यांत पडले मोती पंतांसारखा भ्रतार जन्मोजन्मी मोती चिंती ।।

२. पंढरीच्या यात्रेत विठ्ठलनामाचा गजर, रावांच्या सेवेला...... नेहमीच हजर ।।

३. मराठ्यांच्या मुलुखात भवानीची वारी सैन्य चालले चढाईवर त्यात.....रावांची स्वारी

४. शंकराच्या पिंडीवर बेलाचे पान....रावांचे नाव घेते राखते सर्वांचा मान

५. नंदन वणीच्या कोकिळा बोलती गोड...... राणी माझा तळहाताचा फोड

टीम आपलं मंत्रालय

नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सेवा हाच संकल्प,
भारत हीच पहिली प्रेरणा ... ७५ वर्षे

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान

दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५

#SwasthNariSashaktParivar

राष्ट्राच्या आरोग्य दृष्टीकोनात बदल घडवण्यासाठी –संपूर्ण देशभर महिला आरोग्य तपासणी, उपचार सेवा आणि पोषण यावर विशेष भर

अभियानातील उपक्रम

सर्व महिलांसाठी तपासणी आणि आरोग्य सेवा

- रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंत रोग तपासणी
- स्तन व गर्भाशय मुख व मुख कर्करोग तपासणी
- गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी
- लसीकरण सेवा, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी
- क्षयरोग तपासणी
- सिकलसेल आजार व रक्तक्षय तपासणी
- विशेष तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन

निरोगी जीवनशैली आणि पोषण

- स्थानिक व क्षेत्रीय आहाराला प्रोत्साहन देणे
- गरोदर आणि स्तनदा मातांसाठी तसेच लहान बाळांसाठी योग्य आहार
- मासिक पाळी स्वच्छता व पोषण
- टेक-होम राशन (THR) चे वितरण

आरोग्य सेवा घेणे सोपे करण्यासाठी

- माता व बालसुरक्षा (एमसीपी) कार्ड
- प्रधानमंत्री मातृ वंदना योजना नोंदणी
- आयुष्मान वय वंदना कार्ड
- सिकलसेल कार्ड
- पोषण ट्रॅकरमध्ये लाभार्थी नोंदणी

नागरिकांचा सक्रिय सहभाग

- रक्तदान शिबीर
- निक्षय मित्र स्वयंसेवक नोंदणी
- अवयवदान नोंदणी

- प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे
- असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिरे (मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग)
- मोफत चष्मा वाटपासह नेत्र तपासणी शिबिरे
- दंत रोग तपासणी शिबिरे
- माता आणि बाल आरोग्य शिबिरे (प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण)
- महिला आणि बालकांसाठी पोषण जागरूकता सत्रे
- आयुष आणि योग शिबिरे
- क्षयरोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे

@७५
संस्थांमध्ये
दि. १७ सप्टेंबर २०२५
रोजी
सेवा विशेष उपक्रम

- रक्तदान शिबिरे
- अवयवदान प्रतिज्ञा शिबिरे
- मोफत औषध वितरण शिबिरे
- निदान शिबिरे (पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी)
- कर्करोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे
- मानसिक आरोग्य समुपदेशन शिबिरे
- व्यसनमुक्ती जागरूकता सत्रे
- किशोरवयीन आरोग्य सत्रे
- शालेय आरोग्य तपासणी शिबिरे
- स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता शिबिरे
- ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर आरोग्य मेळावे / प्रदर्शने
- दुर्गम भागांसाठी टेलिमेडिसिन सल्लामसलत

अधिक माहितीसाठी जवळच्या आयुष्मान आरोग्य मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आरोग्य केंद्र किंवा अंगणवाडी केंद्राशी संपर्क साधा

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रकाश आबिटकर
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

मेघना साकोरे - बोर्डीकर
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

स्वस्थ नारी, सशक्त परिवार, हाच आहे विकसित भारताचा आधार



लिहिते व्हा...

आपलं मंत्रालय

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई–मेलवर पाठवावेत.

आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
ई–मेल : **aaplemantralay@gmail.com**